रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड मंगळवार । दि. २२ सप्टेंबर २०२६ । अंक १०७ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## दीड कोटींचा दारुसाठा जप्त

**महाड :** महाडमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाने मोठी कारवाई करत गोवा बनावटीच्या रॉयल ब्ल्यू दारूचे तब्बल १ हजार ४८० बॉक्स जप्त केले आहेत. या कारवाईत दारूसह जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची अंदाजे किंमत १ कोटी ५९ लाख २६ हजार ४०० रुपये असल्याची प्राथमिक माहिती आहे. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून, त्याचे नाव विभागाकडून अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही. ही कारवाई दुय्यम निरीक्षक एस.पी. पिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक दुय्यम निरीक्षक निमेश नाईक, जवान डी.डी. पोटे, मनोज गायकवाड यांनी केली.

## २६७ सफाई कर्मचाऱ्यांना दिलासा

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील रेल्वे स्थानकांवर गेल्या सुमारे ३० वर्षांपासून स्वच्छता व देखभालीचे काम करणाऱ्या २६७ सफाई कामगारांना औद्योगिक न्यायालयाने दिलासा दिला आहे. ठेकेदार किंवा व्यवस्थापन बदलल्याच्या कारणावरून कामगारांच्या सेवेला धक्का पोहोचवू नये, तसेच सेवा परिस्थितीबाबत 'स्टेटस क्को' कायम ठेवावा, असे निर्देश न्यायालयाने दिले. न्यायालयाच्या आदेशामुळे कामगारांमध्ये समाधानाचे वातावरण असून, त्यांच्या रोजगारासाठी पुढील न्यायालयीन लढा सुरू राहणार असल्याचे संघटनेचे अध्यक्ष महादेव वाघमारे यांनी सांगितले.




## वेधक

### प्रसिद्ध अभिनेता सौरव गुर्जरला अटक

**नवी दिल्ली :** लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक शोषण केल्याच्या आरोपावरून प्रसिद्ध अभिनेता आणि माजी कुस्तीपटू सौरव गुर्जर याला पोलिसांनी अटक केली आहे. २९ वर्षीय तरुणीने १५ ऑगस्ट रोजी गाचीबोवली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनंतर पोलिसांनी गुर्जरविरोधात लूकआउट सर्कुलर जारी केले. १७ सप्टेंबर रोजी दुबईहून मुंबईत परतल्यानंतर विमानतळावर इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर हैदराबाद पोलिसांनी त्याला दंडाधिकाऱ्यांसमोर हजर केले. न्यायालयाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली.

### कोरड्या नदीपात्रातच गणपती विसर्जन

**नवी दिल्ली :** आंध्र प्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यातील पुट्टलुरू येथे तीव्र दुष्काळामुळे चित्रावती नदी पूर्णपणे कोरडी पडली आहे. त्यामुळे गणपती विसर्जनासाठी पाणी उपलब्ध न झाल्याने भाविकांना मूर्ती कोरड्या नदीपात्रातच ठेवून बाप्पाला निरोप द्यावा लागला. नदीपात्रात पाण्याचा थेंबही नसल्याने पारंपरिक विसर्जनाची पद्धत शक्य झाली नाही. भेगा पडलेल्या कोरड्या नदीपात्रात गणेशमूर्ती ठेवतानाचे व्हिडिओ आणि छायाचित्रे सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. दुष्काळाची तीव्रता दाखवणारे हे दृश्य देशभर चर्चेचा विषय ठरले आहे.

### पाणंद रस्त्यांसाठी डिजिटल मॅपिंग

**पुणे :** शेतकऱ्यांना शेतजमिनीपर्यंत बारमाही दळणवळणाची सुविधा मिळावी यासाठी राज्य सरकारने 'महापाणंद गतिशक्ती' अभियान सुरू केले आहे. राज्यातील सुमारे चार लाख शेत-पाणंद रस्त्यांचे डिजिटल मॅपिंग करून 'महापाणंद ग्रीड' उभारण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात प्रत्येक ग्रामपंचायतीमधून किमान दोन रस्त्यांची निवड करून विनाशुल्क सीमांकन केले जाणार आहे. रस्त्यांवरील अतिक्रमणे हटविण्याची जबाबदारी तहसीलदारांवर राहणार आहे.

### आज रायगडात पावसाचा येलो अलर्ट

**मुंबई :** परतीच्या पावसाला सुरुवात झाली असून, राज्यात ऊन-पावसाचा खेळ सुरू आहे. हवामान विभागाने मंगळवारी (दि. २२ सप्टेंबर) रायगडला येलो अलर्ट दिला आहे. जिल्ह्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे. दरम्यान, बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले असून, त्याचा परिणाम राज्यातील हवामानावर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी पावसादरम्यान खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# भाड्याच्या घरात 'हिवताप'

- गेली ३५ वर्षे हक्काची जागेची प्रतीक्षा
- महिन्याकाठी १६ हजार रुपयांचा भार



। रायगड । प्रमोद जाधव ।

डेंग्यू-मलेरियासारख्या आजारांविरोधात लढणाऱ्या हिवताप कार्यालयालाच गेली ३५ वर्षे हक्काच्या जागेसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. अलिबागमधील श्रीबाग येथे खासगी इमारतीत भाडेतत्त्वावर सुरू असलेल्या या कार्यालयावर महिन्याकाठी सुमारे १६ हजार रुपयांचा भाड्याचा भार पडत आहे. शासनाकडून स्वतःची जागा आणि इमारत मिळत नसल्याने सार्वजनिक निधीचा वर्षानुवर्षे भाड्यावर खर्च होत आहे.

डासांपासून होणाऱ्या डेंग्यू व मलेरिया आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी रायगड जिल्ह्यात स्वतंत्र जिल्हा हिवताप कार्यालय आहे. गेल्या ३५ वर्षांपासून हे कार्यालय श्रीबाग येथील खासगी इमारतीत भाडेतत्त्वावर सुरू आहे.

जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय, तांत्रिक शाखा, आस्थापना शाखा, भांडार, प्रयोगशाळा आणि लेखा शाखा असे विविध विभाग याच इमारतीत आहेत. मात्र, स्वतःची इमारत नसल्याने जागेअभावी कामकाजावर मर्यादा येत आहेत. भांडारासाठी बाहेरील जागेचा वापर करण्याची वेळही आली आहे.जिल्ह्यातील रुग्णांचे नमुने तपासणे, प्रयोगशाळेत पडताळणी करणे, नोंदी ठेवणे, डेंग्यू-मलेरिया रुग्णांसाठी औषधांचा पुरवठा करणे, ग्रामपंचायत स्तरावर जनजागृती करणे, तसेच डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी कोरडा दिवस पाळण्यासह विविध उपाययोजनांची माहिती देण्याचे काम या कार्यालयातून केले जाते.गेल्या अनेक वर्षांपासून सुमारे १६ ते १७ हजार रुपये मासिक भाडे भरावे लागत आहे. म्हणजेच वर्षाला दोन लाखांहून अधिक रक्कम केवळ भाड्यापोटी खर्च होत आहे. ३५ वर्षांत लाखो रुपये भाड्यावर खर्च झाले; मात्र हक्काची जमीन आणि इमारत अद्याप मिळालेली नाही.

दरम्यान, हिवताप कार्यालयाला स्वतःची जमीन उपलब्ध •➤पान २ वर

### प्रयोगशाळा, भांडारालाही जागेची कमतरता

कार्यालयासाठी उपलब्ध असलेली जागा अपुरी असल्याने विविध विभागांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. अद्ययावत प्रयोगशाळा, स्वतंत्र आस्थापना विभाग आणि पुरेसे भांडार कक्ष उपलब्ध नसल्याने कामकाजावर त्याचा परिणाम होत आहे. भांडारासाठी बाहेरील जागेचा वापर करण्याची वेळ विभागावर आली असल्याची माहिती समोर आली आहे.

### ३५ वर्षांत जवळपास ६७ लाख भाडे अदा

गेल्या ३५ वर्षांपासून खासगी इमारतीत भाडेतत्त्वावर कार्यालय सुरू असल्याने शासनाला दरवर्षी लाखो रुपये खर्च करावे लागत आहेत. सध्या सुमारे १७ हजार रुपये मासिक भाडे दिले जात असून, वर्षाला दोन लाखांहून अधिक रक्कम केवळ भाड्यापोटी खर्च होत आहे. साडेतीन दशकांचा विचार केला तर या कार्यालयासाठी भाड्यापोटी आतापर्यंत ६७ लाखांहून अधिक खर्च झाला आहे.

### कार्यालयही 'फिरते'च!

गेली अनेक वर्षे हिवताप कार्यालयाला कायमस्वरूपी ठिकाण मिळालेले नाही. पूर्वी पेण, त्यानंतर पनवेल आणि आता अलिबागच्या श्रीबाग येथे कार्यालय सुरू आहे. कार्यालयाच्या ठिकाणात होणाऱ्या बदलांमुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांसोबतच नागरिकांनाही कामासाठी धावपळ करावी लागते. स्वतःची हक्काची जागा कधी मिळणार, हा प्रश्न आता ३५ वर्षांनंतरही कायम आहे.

> हिवताप अधिकारी कार्यालयाला स्वतःच्या मालकीची जमीन मिळावी, यासाठी शासनाकडे मागणी करण्यात येणार आहे. स्वतःच्या हक्काचे कार्यालय उभारल्यास आवश्यक सुविधा उपलब्ध होतील आणि कामाला अधिक गती मिळेल.
> – अनिल पाटील, जिल्हा हिवताप अधिकारी

# वस्ती सुधार योजनांची ३६ कामे अपूर्णच!




मार्च 2027 पर्यंत कामे पूर्ण न झाल्यास निधी शासनजमा होण्याची शक्यता

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अनुसूचित जाती, नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांचा विकास करण्यासाठी मंजूर झालेल्या ४३ कामांपैकी तब्बल ३६ कामे अद्याप अपूर्णच आहेत. तीन कोटी ५२ लाखांचा निधी मंजूर होऊन त्यातील ९० टक्के निधी तालुका स्तरावर वर्ग करण्यात आला असतानाही आतापर्यंत केवळ सात कामे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे निधी उपलब्ध असूनही विकासाची कामे रखडल्याचे चित्र समोर आले आहे. मार्च २०२७ पर्यंत ही कामे पूर्ण न झाल्यास निधी शासनाकडे जमा होण्याची शक्यता आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत अनुसूचित जाती, नवबौद्ध घटकांच्या विकासासाठी विविध योजना राबविल्या जातात. ग्रामपंचायतीच्या पाच वर्षांच्या बृहत आराखड्यानुसार सार्वजनिक विकासकामांना मंजुरी दिली जाते.

२०२५-२६ या वर्षासाठी वस्ती सुधार योजनेंतर्गत समाजकल्याण विभागाला तीन कोटी ५२ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला. •➤पान २ वर

### अशी मंजूर होतात कामे

ग्रामपंचायतीच्या पाच वर्षांच्या बृहत आराखड्यानुसार कामांना मंजुरी दिली जाते. समाजकल्याण विभाग आयुक्त कार्यालयाकडून निधी वितरीत केला जातो. कामानुसार ९० टक्के निधी गटविकास अधिकाऱ्यांना दिला जातो. काम पूर्ण झाल्यानंतर पाहणी, काम पूर्णत्वाचा दाखला, कामापूर्वी व कामानंतरचे छायाचित्र आणि आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर उर्वरित १० टक्के निधी वितरीत केला जातो.

## विद्यार्थ्यांच्या आत्महत्याप्रकरणी शेकाप आक्रमक

**शिक्षण संस्थेला जाब विचारण्यासाठी विद्यार्थी संघटना एकवटली**




। मुंबई । प्रतिनिधी ।

आयआयटी मुंबईतील द्वितीय वर्षाचा विद्यार्थी साहिल वाकोडे याच्या आत्महत्येने शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असतानाच, शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला आहे. शिक्षण संस्थेला जाब विचारण्यासाठी शेकाप विद्यार्थी पुरोगामी विद्यार्थी संघटनेसह अन्य संघटनांचे विद्यार्थी सोमवारी एकवटले.

साहिलने आयआयटी मुंबईच्या पवई परिसरातील •➤पान २ वर

## धनगरवाडीत गोवंशाची कत्तल

। खोपोली । प्रतिनिधी ।

जुन्या मुंबई-पुणे मार्गालगत काटरंग धनगरवाडी परिसरात गोवंश जातीच्या जनावराची कत्तल करून मांस नेल्याची घटना उघडकीस आली आहे. सणासुदीच्या काळात हा प्रकार समोर आल्याने परिसरात संताप व्यक्त होत आहे. रविवारी रात्री गवतामध्ये गोवंशाची कत्तल झाल्याची माहिती ग्रामस्थांना मिळाल्यानंतर त्यांनी खोपोली पोलिसांना कळविले. सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सागर डुकरे यांच्या उपस्थितीत पंचनामा केला. घटनास्थळी चारचाकी वाहनाच्या टायरच्या खुणा आढळून आल्याने कत्तलीनंतर मांस वाहनातून नेल्याचा संशय आहे.

# दुष्काळ जाहीर करा, हेक्टरी ५० हजार द्या!

**विविध मागण्यांसाठी शेकापचा बैलगाडी मोर्चा; मागण्यांचा विचार न झाल्यास 'चक्काजाम'चा इशारा**

। केज । प्रतिनिधी ।

पावसाने पाठ फिरवल्याने खरीप पिके करपली, उत्पादन खर्चही वसूल होण्याची शक्यता मावळली आणि २०२५ चा खरीप-रब्बी पीकविमाही अद्याप प्रलंबित आहे. या संकटात शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला असताना शासनाने केवळ आश्वासनांवर न थांबता तातडीने ठोस मदत द्यावी, दुष्काळ जाहीर करून हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत, प्रलंबित पीकविमा तातडीने अदा करणे, वीजबिल माफ करणे आणि शेतीपंपांना किमान आठ तास अखंड वीजपुरवठा करावा, जनावरांसाठी चाऱ्याची तातडीने व्यवस्था करण्यात यावा, या मागण्यांसाठी •➤पान २ वर



> शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. सरकारने प्रत्यक्ष निर्णय घेऊन त्यांच्या खात्यावर मदत पोहोचवावी. मागण्यांचा तातडीने विचार न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल. त्यानंतर शेतकऱ्यांच्या रोषाला आणि आंदोलनाला सरकारला सामोरे जावे लागेल.– मोहन गुंड, सदस्य, शेकाप राज्य चिटणीस मंडळ

### काय आहेत प्रमुख मागण्या?

बीड जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची तातडीची मदत द्यावी., जनावरांसाठी तात्काळ चारा उपलब्ध करून द्यावा., सन २०२५ च्या खरीप व रब्बी हंगामाचा प्रलंबित पीकविमा तातडीने वितरित करावा., शेतीपंपांचे तसेच घरगुती वीजबिल संपूर्ण माफ करावे., शेतीपंपांसाठी किमान आठ तास अखंड वीजपुरवठा करावा., शेतकऱ्यांवर स्मार्ट मीटरची सक्ती तात्काळ बंद करावी., बीड जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी उसाचा दुसरा हप्ता तातडीने अदा करावा., केज शहरातील शेतकऱ्यांनाही ग्रामीण कृषी योजनांचा लाभ द्यावा.

**सेझच्या जमिनी शेतकऱ्यांना परत मिळणार का? | पेण-पनवेल-उरणच्या शेतकऱ्यांचा सवाल**

# रिलायन्ससाठी धावणारे पुढारी आता धावणार का?

। पेण । प्रतिनिधी ।

विकासाचे स्वप्न दाखवून दोन दशकांपूर्वी शेतकऱ्यांच्या जमिनी सेझसाठी घेण्यात आल्या; मात्र प्रकल्पच प्रत्यक्षात आला नाही. आता पडून असलेल्या या जमिनी पुन्हा शेतकऱ्यांच्या ताब्यात मिळणार का, हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे, रिलायन्ससाठी जमीन मिळवून देताना शेतकऱ्यांची समजूत काढण्यासाठी धावपळ करणारे तत्कालीन राजकीय नेते आता त्याच शेतकऱ्यांच्या जमिनी परत मिळवून देण्यासाठी किती ताकदीने पुढे येतात, याकडे पेण, पनवेल आणि उरण तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्रासाठी २००६ मध्ये जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू झाली. पेण, पनवेल आणि उरण तालुक्यांतील ४५ गावांचा या प्रकल्पात समावेश होता. मोठ्या प्रमाणावर जमीन संपादित करण्यात आली; मात्र प्रकल्पासाठी आवश्यक जमीन निर्धारित कालावधीत संपादित न झाल्याने आणि शेतकऱ्यांच्या विरोधामुळे प्रकल्प रखडला. २००८ मधील मतदानातही ग्रामस्थांनी प्रकल्पाला विरोध केल्याचे वृत्तांत आहेत.

दरम्यान, रिलायन्सकडून काही जमीन शेतकऱ्यांकडून थेट खरेदी करण्याची प्रक्रिया झाली होती. २००६ मध्ये •➤पान २ वर

### आता जमिनी परत देण्याची वेळ!

दोन दशकांनंतरही प्रकल्प साकारला नसल्याने सेझसाठी संपादित जमिनी शेतकऱ्यांना परत मिळाव्यात, अशी मागणी जोर धरत आहे. जून २०२६ मध्ये महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महामुंबई सेझसाठी संपादित होऊनही प्रकल्पासाठी वापरात न आलेल्या जमिनींबाबत वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे आदेश रायगड जिल्हाधिकाऱ्यांना दिल्याचे वृत्त आहे. बैठकीला पेण, पनवेल आणि उरणचे लोकप्रतिनिधीही उपस्थित होते. यापूर्वीही सेझसाठी संपादित जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याबाबत विधानसभेत घोषणा केली होती.

### आता खरी परीक्षा लोकप्रतिनिधींची!

रिलायन्सला जमीन मिळावी म्हणून शेतकऱ्यांची समजूत काढण्यासाठी पुढाकार घेतला असेल, तर आता जमीन परत मिळवून देण्यासाठीही तोच पुढाकार दाखवणार का? असा थेट सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. तत्कालीन राजकीय प्रक्रियेशी संबंधित काही व्यक्ती आजही सार्वजनिक जीवनात आहेत. त्यामुळे आता त्यांच्या भूमिकेकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. म्हणूनच उद्याच्या मोर्चाला महत्त्व आले आहे.

### आज शेतकऱ्यांचा मोर्चा

मंगळवार, दि.२२ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता महात्मा गांधी मंदिर, पेण येथून भव्य शेतकरी मोर्चा काढण्यात येणार आहे. हा मोर्चा उपविभागीय अधिकारी कार्यालय, पेण येथे धडकणार असून, सेझबाधितांच्या जमिनी पूर्ववत त्यांच्या मूळ मालकांना परत देण्याची मागणी करण्यात येणार आहे. पेण तालुक्यासह परिसरातील शेकडो नव्हे तर, हजारो शेतकरी आणि भूमीपुत्र या मोर्चात सहभागी होणार असून, प्रशासनानेही संभाव्य कायदा-सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर या प्रश्नाची दखल घेतली आहे. त्यामुळे या मोर्चाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले आहे.

## पनवेल महापालिकेत १७.३४ कोटींच्या अनियमिततेचा आरोप

- २८८ कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीवर प्रश्न उपस्थित
- प्रहार संघटनेकडून कारवाईची मागणी

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

पनवेल महानगरपालिकेत २८८ कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीमध्ये नियमबाह्य पद्धतीने लाभ देण्यात आल्याने अंदाजे १७ कोटी ३४ लाख रुपयांची आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप प्रहार संघटनेने केला आहे. माहितीच्या अधिकारातून मिळालेल्या कागदपत्रांच्या आधारे हा आरोप करण्यात आला असून, या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

पनवेल महापालिकेत समाविष्ट झालेल्या २३ ग्रामपंचायतींमधील कर्मचाऱ्यांच्या समावेशनाला शासनाने काही अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता •➤पान २ वर

> आयुक्तांची मान्यता मिळाल्यानंतरही आदेश काढण्यास विलंब होत असेल तर त्यामागील अधिकारी-कर्मचाऱ्यांची भूमिका तपासावी. मूळ नस्ती गायब होण्याचीही चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करावी.
> – डॉ. सुनील शिरीषकर, जिल्हाध्यक्ष, प्रहार संघटना

# अलिबाग-बेलकडे मार्गावर धुरळा!

| चौल | प्रतिनिधी |

**अलिबाग-रेवदंडा मुख्य मार्गावरील कुरुळ ते बेलकडेदरम्यान गणेशोत्सवाच्या तोंडावर खड्डे बुजविण्याच्या नावाखाली रस्त्यावर टाकलेली खडी आता सर्वत्र पसरल्यामुळे दुचाकी घसरून अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यातच वाहनांच्या वेगाने उडणाऱ्या धुळीने प्रवाशांना अक्षरशः नाक-तोंड झाकून जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. नागरिकांच्या आरोग्याबरोबरच त्यांच्या जीविताचा प्रश्न निर्माण झाला असतानाही संबंधित यंत्रणेचे दुर्लक्ष सुरू असल्याने संताप व्यक्त होत आहे.**



- **नाक-तोंड झाकून प्रवासाची वेळ**
- **रस्त्याच्या कामाचा बोजवारा उडाल्याने संताप**

अलिबाग ते मुरुड रस्त्याचे रुंदीकरण व सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम एमएसआयडीसीच्या माध्यमातून सुरू आहे. या कामामुळे आधीच अनेक ठिकाणी वाहतूक, धूळ आणि खड्ड्यांचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. त्यात कुरुळ ते बेलकडेदरम्यान पडलेले मोठमोठे खड्डे गणेशोत्सवापूर्वी घाईघाईने साधी खडी टाकून बुजविण्यात आले. मात्र, खडी व्यवस्थित दाबून अथवा रस्त्याच्या पृष्ठभागाशी समतल करून काम पूर्ण करण्याऐवजी थातुरमातुर मलमपट्टी करण्यात आल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

खड्ड्यांमध्ये टाकलेली खडी आता बाहेर येऊन रस्त्यावर पसरली आहे. वाहनांची वर्दळ वाढली की ही खडी चाकांखालून उडत आहे. त्यामुळे दुचाकीस्वार घसरून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी खडीचा अंदाज न आल्याने धोका आणखी वाढतो. रस्त्याची दुरुस्ती करण्याच्या नावाखाली नागरिकांसाठी नवा धोका निर्माण झाल्याने संताप व्यक्त होत आहे.

रस्त्यावर पसरलेली खडी वाहनांच्या टायरखाली येताच मोठ्या प्रमाणात धुरळा उडत आहे. या धुळीमुळे वाहनचालक, पादचारी, स्थानिक रहिवासी आणि प्रवाशांना नाक-तोंड झाकून प्रवास करावा लागत आहे. सतत धुळीच्या संपर्कात राहिल्याने श्‍वसनासंबंधी त्रास होण्याची शक्यता असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

> खड्ड्यातील बाहेर आलेली खडी अपघातास कारणीभूत ठरत आहे. त्यातच उडणाऱ्या धुळीचा त्रास प्रचंड आहे. नागरिकांना नाक-तोंड झाकून प्रवास करावा लागत आहे. धुळीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. संबंधित विभागाने तातडीने रस्त्याची पाहणी करून खडी हटवावी आणि धुळीवर उपाययोजना करावी. नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू राहिल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.
>
> – रुपेश पाटील, ग्रामस्थ, बेलकडे

दरम्यान, कुरुळ ते बेलकडे दरम्यान पसरलेली खडी तातडीने हटवावी, रस्त्याची योग्य पद्धतीने डागडुजी करावी आणि धुळीवर नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

### सहा महिन्यांत रस्ते उधळले?

एमएसआयडीसीच्या माध्यमातून सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाच्या दर्जावरही नागरिकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. यापूर्वी करण्यात आलेल्या काही रस्त्यांची अवस्था काही महिन्यांतच खराब झाल्याचा आरोप आहे. त्यामुळे वारंवार दुरुस्तीची वेळ का येते, कामाचा दर्जा तपासला जातो का, तसेच सार्वजनिक पैशातून होणाऱ्या कामाची जबाबदारी कोण घेणार, असे सवाल उपस्थित होत आहेत.

## पान १ वरुन

## वस्ती सुधार योजनांची ३६ कामे अपूर्णच!

त्यातून समाजमंदिर, गटार, सभामंडप, अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, विद्युत, पाइपलाइन आदी ४३ कामांना मंजुरी देण्यात आली.

मंजूर निधीपैकी ९० टक्के निधी तालुका स्तरावर गटविकास अधिकाऱ्यांना वर्ग करण्यात आला. मात्र, निधी उपलब्ध होऊनही आतापर्यंत फक्त सात कामे पूर्ण झाली असून, ३६ कामे अपूर्ण आहेत. म्हणजेच, मंजूर कामांपैकी केवळ १० टक्के कामे पूर्ण करण्यात यंत्रणेला यश आले आहे.

अपूर्ण कामे मार्च २०२७ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा उर्वरित निधी समाजकल्याण विभागाच्या आयुक्त कार्यालयाकडे वर्ग केला जाणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे निधी असूनही कामे रखडल्याने अनुसूचित जाती, नवबौद्ध वस्त्यांचा सार्वजनिक विकास पुन्हा प्रतीक्षेत राहण्याची शक्यता आहे.

**वस्ती सुधार योजनेवर दृष्टीक्षेप**

- मंजूर कामे : ४३
- शासनाकडून प्राप्त निधी : ३ कोटी ५२ लाख रुपये
- कामासाठी वर्ग केलेला निधी : ९० टक्के
- पूर्ण कामे : ०७
- अपूर्ण कामे : ३६
- काम पूर्ण झाल्यावर शिल्लक निधी : १० टक्के

## दुष्काळ जाहीर करा, हेक्टरी ५० हजार द्या!

शेतकरी कामगार पक्षाने सोमवारी (दि. २१) केज तहसील कार्यालयावर भव्य बैलगाडी मोर्चा काढला.

आंबेडकर चौकातून वाजतगाजत, शासनविरोधी घोषणांनी हा मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला. भाई मोहन गुंड यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या मोर्चात परिसरातील शेतकरी बैलगाड्यांसह मोठ्या संख्येने सहभागी झाले. पावसाअभावी शेतातील उभी पिके करपली असून, शेतकऱ्यांचा लागवडीचा खर्चही निघत नसल्याची भूमिका आंदोलकांनी मांडली. मोर्चादरम्यान करपलेल्या पिकांची होळी करून शासनाच्या शेतकरी धोरणांविरोधात संताप व्यक्त करण्यात आला. घोषणा देत तहसील कार्यालयावर पोहोचलेल्या आंदोलकांनी विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना दिले.

यावेळी शेकाप राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य मोहन गुंड यांनी शासनाला इशारा देताना सांगितले की, बीड जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करून हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी. २०२५ चा प्रलंबित पीकविमा द्यावा, वीजबिल माफ करावे आणि शेतकऱ्यांना पुरेसा वीजपुरवठा करावा. शासन दरबारी आमच्या मागण्यांचा तातडीने विचार झाला नाही, तर चक्काजाम आंदोलन छेडण्यात येईल. शेतकऱ्यांच्या रोषाला सरकारला सामोरे जावे लागेल.

शेकापचे बीड जिल्हा चिटणीस ॲड. नारायण गोले पाटील आणि भाई बापूसाहेब सोळुंके यांनीही सरकारच्या धोरणांवर टीका करत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली.

मोर्चाच्या यशस्वीतेसाठी हनुमंत भोसले, डॉ. हनुमंत सौदागर, प्रकाश भन्साळी, राहुल खोडसे, राष्ट्रपाल पाटुळे, अक्षय भुंबे, शेकाप महिला आघाडीच्या शिवकन्या गुंड, सविता आकुसकर, भाई अशोक रोडे, शंभुराजे पाटील, ॲड. निखिल बचुटे, हभप अशोक महाराज, मंगेश देशमुख, महेश गायकवाड, बालु भासले, दिगंबर मगर, धनराज भासले, दिनकर बप्पा कदम, अनिल नखाते, विनोद आगलावे, किशोर सुरवसे, मुस्तक शेख, गोविंद गुंड, दादा हास्वले, बाबुराव जाधव, दिगाबर गुंड यांच्यासह महिला कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले.

## पनवेल महापालिकेत १७.३४ कोटींच्या अनियमिततेचा आरोप

दिली होती. यामध्ये पहिल्या टप्प्यातील १०५, दुसऱ्या टप्प्यातील १८३ आणि तिसऱ्या टप्प्यातील ३२ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. त्यापैकी पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील २८८ कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीवर लेखा विभागाने आक्षेप नोंदविल्याचे प्रहार संघटनेचे म्हणणे आहे.

संघटनेच्या दाव्यानुसार, शासनाच्या अटींकडे दुर्लक्ष करून पूर्वलक्षी प्रभावाने वेतनलाभ देण्यात आल्याने महापालिकेवर अतिरिक्त आर्थिक भार पडला. आयुक्तांच्या निर्देशानंतर वेतन निश्चितीची तपासणी करण्यात आली असून सुधारित वेतन निश्चितीचा प्रस्तावही सादर करण्यात आल्याचे संघटनेने म्हटले आहे.

मात्र, सुधारित आदेश अद्याप का काढण्यात आले नाहीत, असा सवाल प्रहार संघटनेने उपस्थित केला आहे. तसेच २८८ कर्मचाऱ्यांची मूळ वेतन निश्चितीची नस्ती उपलब्ध नसल्याची माहिती माहितीच्या अधिकारात मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे.

## भाड्याच्या घरात 'हिवताप'

करून देऊन सुसज्ज इमारत उभारण्याची मागणी आता पुन्हा जोर धरत आहे. स्वतंत्र इमारत मिळाल्यास प्रयोगशाळा, भांडार, कार्यालयीन विभाग आणि अन्य सुविधा नियोजनबद्ध पद्धतीने उभारता येतील. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांना अधिक प्रभावी आरोग्यसेवा देण्यास मदत होणार आहे.

## रिलायन्ससाठी धावणारे पुढारी

## आता धावणार का?

तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी कंपनीला शेतकऱ्यांशी थेट करार करून जमीन ताब्यात घेण्यास परवानगी दिल्याचे तत्कालीन वृत्तांत नमूद करतात. काही जमिनी सुपीक व लागवडीयोग्य असल्याच्या महसूल नोंदी असतानाही व्यवहार झाल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्यावेळी पेणचे तत्कालीन आमदार रवींद्र पाटील राज्य मंत्रिमंडळात मंत्री होते. सेझसाठी जमीन मिळवून देताना स्थानिक राजकीय नेते, गावपातळीवरील पदाधिकारी आणि काही तत्कालीन आमदारपुत्रांनी शेतकऱ्यांची समजूत काढण्यासाठी भूमिका बजावल्याचा आरोप आज केला जात आहे. या आरोपांबाबत संबंधितांची अधिकृत बाजू समोर येणे आवश्यक आहे.

सरकारने जमिनींच्या सद्यःस्थितीचा अहवाल मागविल्याने या प्रकरणाला पुन्हा वेग आला आहे. दोन दशकांपूर्वी विकासाच्या नावाखाली घेतलेली जमीन आजही पडून असेल, तर तिचा अंतिम हक्क कोणाचा आणि ती मूळ शेतकऱ्यांना परत कधी मिळणार? याचे उत्तर आता शासनासोबतच स्थानिक लोकप्रतिनिधींनाही द्यावे लागणार आहे.

## विद्यार्थ्यांच्या आत्महत्याप्रकरणी शेकाप आक्रमक

वसतिगृहात आत्महत्या केली. मागील काही महिन्यांपासून प्राध्यापकांनी जातीवाचक वक्तव्य करून मानसिक त्रास दिल्यामुळे त्याने टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप त्याच्या नातेवाईकांनी केला आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला असून, तपास सुरू आहे.

शेतकरी कामगार पक्षाने आक्रमक भूमिका घेत शिक्षण संस्थेला जाब विचारण्यासाठी आंदोलन केले. शेकाप विद्यार्थी पुरोगामी विद्यार्थी संघटनेचे राज्य प्रमुख साम्या कोरडे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व सदस्य आंदोलनात सहभागी झाले. सुरुवातीला मेणबत्ती प्रज्वलित करून साहिलला श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. दरम्यान, पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले.

या प्रकाराबाबत आंदोलनकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत मागील नऊ महिन्यांत चार विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचा दावा केला. यामध्ये तिघेजण मागासवर्गीय समाजातील असल्याचे सांगत शैक्षणिक संस्थेत अशा घटना का घडतात, असा सवाल उपस्थित करण्यात आला.

आत्महत्या प्रकरणी गुन्हा दाखल होऊनही आरोपींना अटक झालेली नाही, त्यांना तात्काळ अटक करावी, अशी मागणी विद्यार्थी पुरोगामी संघटनेचे प्रमुख साम्या कोरडे यांनी केली.


### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे धाकटे वेणगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे धाकटे वेणगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| अ.क्र. | नांव | सर्व्हे नंबर | एकूण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १ | प्रोमिला नरुला | २९/१ब | १-५८-६० | १३.४२ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एकवीस (२१) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : २२/०९/२०२६

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ता : कोर्ट व्ह्यु को.ऑप.हौ.सोसायटी,
शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ८८८८०९८०८८/९५६१५७५६२६

### -: जाहीर नोटीस :-

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविळयात येते की, खाली नमुद केलेल्या शेत जमीन मिळकती हया खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असून ती त्यांचे खुद्द ताबा, कबजा, मालकी, वहीवाटीतील आहे, त्या शेत जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे राजखलाटी, ता. रोहा जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे क्र./ गट क्र | एकूण क्षेत्र हे आर | आकार रू.पै. | भोगवटा वर्ग |
|---|---|---|---|---|
| उमेश मनोहर पाटील | १६९ | २.८६.९० पैकी २.०६.९० हे.आर. | १.९७ | १ |

वरील मिळकतीसंबधात आमचे अशिल श्री. पराग मानसिंग गायकवाड, नवी मुंबई व श्री राकेश इंदरमल अगरवाल चेंबूर, मुंबई यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे, यास्तव वरील मिळकतींवर अन्य कोणाचा दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, अखत्यार लिएन, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र निवारा, कुळवहीवाट, ताबा, कबजा, वहीवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉर्टेगेज, संपादन, रिझव्हेशन, रेक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध तसेच एकत्र कुटूंब मिळकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसाचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील मिळकती पुर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

हे कळावे,
दिनांक: २२/०९/२०२६

**ॲड. सागर हिराकांत भगत**
ॲडव्होकेट
मु. उन्हेरे कुमारशेत. पो. पाली,
ता. सुधागड, जि.रायगड
मोबा.नं. ८९८३४५६८४७

### -: जाहीर नोटीस :-

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविळयात येते की, खाली नमुद कलेल्या शेत जमीन मिळकती हया खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असून ती त्यांचे खुद्द ताबा, कबजा, मालकी, वहीवाटीतील आहे, त्या शेत जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे भार्जे. ता सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत**

| मालकाचे नाव | गट/भुमापन क्र | एकूण क्षेत्र हे आर | आकार रू.पै. | भोगवटा वर्ग |
|---|---|---|---|---|
| मितेश आनंद गावडे | २७ | १.०८ | ७.०३ | १ |

वरील मिळकतीसंबधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे, यास्तव वरील मिळकतींवर अन्य कोणाचा दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, अखत्यार लिएन, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र निवारा, कुळवहिवाट, ताबा, कबजा, वहिवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉर्टेगेज, संपादन, रिझव्हेशन, रेक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध तसेच एकत्र कुटूंब मिळकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ आठ दिवसाचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील मिळकती पुर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

हे कळावे,
दिनांक: २१/०९/२०२६

**ॲड. सागर हिराकांत भगत**
ॲडव्होकेट
मु. उन्हेरे कुंभारशेत. पो. पाली,
ता. सुधागड, जि.रायगड
मोबा.नं. ८९८३४५६८४७

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की,

मौजे खरबाची वाडी ता. रोहा जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मालमत्ता मिळकतींचे विद्यमान मालकाकडुन कायमखरेदीने विकत घेण्याविषयी आमचे अशिल यांचे बरोबर बोलणी केली आहेत.

| मालकाचे नांव | गट नंबर/ हिस्सा नंबर | एकूण क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार |
|---|---|---|---|
| १. वंदना सिताराम कदम<br>२. रोहिदास सिताराम कदम<br>३. तुकाराम सिताराम कदम<br>४. रामदास सिताराम कदम | १०/३ | ०-०७-३० | १-१ |

तरी सदर वरील सर्व मिळकतींवर अन्य कोणाचाही वारसाहक्क, दान, बक्षीस, गहाण, साठेकरार, फरोक्त अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क अथवा अधिकार असल्यास किंवा सदर खरेदीबद्दल कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील पत्त्यावर योग्य कागदपत्रांसह लेखी हरकत घ्यावी. उक्त मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकतीच्या पुढील व्यवहाराबाबत बोलणी करुन कार्यवाही पूर्ण केली जाईल व मागाहून घेतलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड.सौ.स्वरदा संदीप साने** ॲडव्होकेट
ऑफिस-मधली आळी, ग.बा.वडेर हायस्कुल जवळ,
हनुमान मंदीरासमारे, पाली ता.सुधागड, जि.रायगड.
मोबाईल नंबर. ९९२१९३३४२८.

### जाहिर नोटीस

या जाहीर नोटीशीने सर्वांना कळविणेत येते की, खालील नमुद मिळकतीचे मालकाने खालील नमुद मिळकत आमचे अशिलाना विकत देण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणताही हक्कहितसंबध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहाण, दान, हक्कसोडपत्र, बक्षिस, फरोक्त वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

**मौजे सांडशी, ता.कर्जत, जि रायगड येथिल मिळकत**

| मालकांची नावे | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १) श्री.अभिषेक आनंद<br>२) श्री.राहुल गुप्ता | ९/१/ई | ०-४१-०० गुठें क्षेत्र | ४-२२ |

वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत हक्कहितसंबंध सुद्धा.

ता. २२ सप्टेंबर २०२६

खरेदीदारातर्फे
**ॲड.स्नेहल बंडु तुरडे**
(ॲडव्होकेट हायकोर्ट)
ऑफिस : गाळा नं.९, विहंग अपार्टमेंट
कोतवाल नगर कर्जत, ता.कर्जत जि रायगड
मो.नं.७६२०२२३९५९

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-वदप आदिवासीवाडी, तालुका-कर्जत, जि.रायगड येथील बिनशेती मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं./ प्लॉट नं. | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| १) आदिल अन्वर शेख<br>२) रेहाना अन्वर शेख | १० | ३५ | ४.३८.५० क्षेत्र व या मिळकतीवर बांधणेत आलेला तळमजल्यावरील बंगला क्र.१८३ क्षेत्र २६७३ चौ फुट आणि मालमत्ता क्र.१८४ क्षेत्र १९२ चौ फुट मिळकतीचे खरेदीखत | ४४-०० |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. २१/०९/२०२६

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क्र. ३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु.कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड,
मो.९५९५२११८६७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी व जिल्हा-रायगड, पोटतुकडी व तालुका रोहा, यांचे हद्दीतील मौजे वाघळी, ता.रोहा, जिल्हा-रायगड यांचे हद्दीतील शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी विकत घेण्यासाठी, मिळकतीचे विद्यमान मालक यांचे बरोबर वाटाघाटी केल्या आहेत. सदर मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे मालकांनी आमचे अशिलास दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**

| गट नं | क्षेत्र : हे.आर.पॉ. | आकार: रु.पै | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| २ | १.२३.३० | २०.८८ | श्री. राहुल शशिकांत पाटील |

तरी वरील मिळकतींचे संदर्भात कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबध, ताबा, मालकी, वहिवाट, बयाना, साठेकरार, लीज, लीएन, चार्ज, बोजा, पोटगीहक्क, विक्री, तारण, गहान, जाणेयेणेचा व इतर हक्क असल्यास त्यांनी हक्काचे पृष्ठयार्थ असणाऱ्या सर्व कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ (तीन) दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कराव्यात, वरील मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास, वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबध नाही अथवा असल्यस तो आमच्या अशिलाच्या लाभांत सोडून दिला आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीबाबत खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही हरकत, तक्रार आमचे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. २२/०९/२०२६

**(ॲड. महेंद्र यशवंत धामणे)**
मु.पो सुप्रीम कॉलनी नागोठणे, ता.रोहा, जि.रायगड
मो. नं. ९७६७२५०११०

### जाहीर नोटीस

दिनांक : २२ सप्टेंबर २०२६

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे अंत्राट तर्फे निड, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.-पै. |
|---|---|---|---|---|
| १) पिंकी भालचंद्र जाधव,<br>२) रिंकु भालचंद्र जाधव उर्फ रिंकु रामदास भगत ३) लक्ष्मी भालचंद्र जाधव, ४) राधीका कृष्णा धुमाळ उर्फ धुमाल,<br>५) पदमा जयवंत सोनावळे,<br>६) पंढरीनाथ सदानंद करडे,<br>७) गीता हरीभाऊ डायरे,<br>८) दिव्या योगेश दळवी,<br>९) लता नितीन मोरगे | ६३ | ५ | ०-३७-०० | ०-३० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या
समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- २२/०९/२०२६

### जाहीर नोटीस

दिनांक : २२ सप्टेंबर २०२६

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे खांडस, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| रामचंद्र गोपाळ ऐनकर | ५४ | ३/अ | २-५१-०० | ०६-०७ |
| | यापैकी लिहून देणार यांच्या मालकीचे क्षेत्र हे ० आर ८५ पॉ ०५ या पैकी विक्री केलेले क्षेत्र ०-४०-०० मात्र. | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-२२/०९/२०२६

### जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे आदाड, ता. मुरूड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत मिळकतीचे विद्यमान १) स्मीता सुभाष महाडिक, २) स्मिता सुभाष महाडीक, ३) स्वेता उमेश दर्गे, ४) सुमित सुभाष महाडिक ५) शैलेश सुभाष महाडिक यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे व तशी बोलणी ही चालू आहेत. सदरची मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| आदाड ता.मुरूड जि.रायगड | ३११ (खाते क्र.१००) | क्षेत्र १.४९.५०<br>पो.ख.०.४५.००<br>एकूण १.९४.५० | १.१६ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचीही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व विनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : २१/०९/२०२६

सही/-
**ॲड. सचिन सदानंद पाटील**
मु. ७६२/ए / बी, आई बंगला,
शिवसागर वसाहत, कुरूळ
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९८८१६३७९२४
ई.मेल : sp3589166@gmail.com

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल हे मौजे हरनेरी, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील खाली नमुद केलेली शेतीजमिन मिळकत त्यांचे विद्यमान मालक श्री. कृष्णा गोविंद मालुसरे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.**
**मौजे हरनेरी, तालुका सुधागड, जिल्हा रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| हरनेरी | ८/१/ब | ०-३५-५०<br>पो.ख. ०-०१-५०<br>०-३७-००<br>पैकी ०-१८-०० क्षेत्राकरीता | ०.१८ |

सदर मिळकत निर्वेध असल्याची हमी विद्यमान मालक यांनी दिली आहे. तरी सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहीवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षीस, चार्ज, ॲटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. या प्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचे विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

पनवेल
दिनांक : २२/०९/२०२६

**ॲड. प्रगती दिनेश ठाकुर,**
नगरपालीका शॉपींग कॉम्प्लेक्स,
ऑफीस क्र.२२, आद्य कातिंवीर वासुदेव
बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, पनवेल,
रायगड मो. नं. ९१७२५६११११

# औद्योगिक परिसरात कोंडला श्वास

- नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर
- प्रदूषणावर आळा घालणारी यंत्रणा कुचकामी

| महाड | प्रतिनिधी |

महाड एमआयडीसीमध्ये गेली काही दिवसांपासून सोडण्यात येणाऱ्या रासायनिक वायूमुळे स्थानिक नागरिकांचा जीव कोंडला आहे. रात्रीच्या सुमारास या परिसरात सर्वत्र धुराचा थर दिसून येत आहे. यामुळे दुर्गंधीयुक्त रासायनिक वायूमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न देखील निर्माण झाला आहे.

महाड एमआयडीसीमधील कंपन्यांतून गेली काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर वायू सोडला जात आहे. या वायूचा थर ठराविक उंचीपर्यंत दिसून येत आहे. औद्योगिक क्षेत्रात बहुतांश कंपन्या या रासायनिक उत्पादन करणाऱ्या आहेत. गेली अनेक वर्षांपासून या औद्योगिक क्षेत्रात प्रदूषणाचा मुद्दा कायम चर्चेत आहे. प्रदूषणामुळे परिसरातील भात शेतीचे नुकसान तर नद्यामधील पाणी दूषित झाले आहे. यावर उपाय म्हणून महाड उत्पादक संघटना आणि प्रदूषण मंडळ महाड औद्योगिक विकास महामंडळ यांच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जात आहे. सामायिक सांडपाणी सुविधा केंद्राच्या माध्यमातून जल शुद्धीकरण प्रकल्प चालवला जात आहे. मात्र, वायू प्रदूषणाबाबत तसा कोणताही ठोस उपाय केलेला नाही. यामुळे ऐन हिवाळ्यात आणि पावसाळ्यामध्ये सुटणारा वायू जमिनीपासून ठराविक उंचीपर्यंत जात असल्याने नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

> रात्री या परिसरातून जात असताना धुके वाटणारा वायूचा थर दिसून येतो. यामुळे दुर्गंधी, तसेच डोळे चुरचुरणे, श्वास घेण्यास त्रास होणे असे त्रास जाणवतात. यावर कारवाई होणे अपेक्षित आहे.
>
> – संतोष गोखले, स्थानिक ग्रामस्थ



गेली दोन दिवस पडणाऱ्या पावसाचा फायदा घेत हवेत रासायनिक अनावश्यक वायू सोडून देण्याचे प्रकार होत आहेत. हवेत सोडलेला वायू पावसाळा आणि दमट हवामानात ठराविक उंचीपर्यंत थांबत आहे. यामुळे वातावरणात धुके असल्याचा अभास निर्माण होत आहे. या वायू प्रदूषणामुळे निर्माण झालेल्या धुकेमय वातावरणामुळे नागरिकांना श्वसन आणि डोळ्याचा आजार होण्याची शक्यता आहे. श्वास कोंडल्यासारखा होत असून डोळे देखील चुरचुरत असल्याचे त्रास होत असल्याचा अनुभव बिरवाडी येथील स्थानिक ग्रामस्थ रेश्मा पारेख यांनी सांगितले. या वायू प्रदूषणावर आळा घालण्यासाठी बसवण्यात यंत्रणा देखील कुचकामी ठरली आहे. यामुळे हवेत कोणते घटक मिसळले आहेत याचे आकलन होत नाही. याबाबत कारवाई झाली नाही तर नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ लागले आहे. महाड औद्योगिक क्षेत्रामध्ये देशमुख कांबळे, नडगाव, आसनपोई, टेमघर, जिते, बिरवाडी, सवाने, आदी गावांचा समावेश आहे. या गावातील नागरिक वायू प्रदूषणामुळे हैराण झालेले आहेत. हवेमध्ये साचून राहणाऱ्या या वायूमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

## हद्दपार आरोपीची पोलिसांना शिवीगाळ

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

हद्दपार आदेशाच्या अटी आणि शर्तीचे उल्लंघन करून प्रतिबंधित क्षेत्रात प्रवेश केलेल्या आरोपीला पकडण्यासाठी पोलीस गेले असता त्याने पोलिसांना शिवीगाळ करून तो तिथून पळून गेला. या प्रकरणी रमजान खान (रा. पाटीलवाडी, पाले खुर्द) यांच्या विरोधात १८ सप्टेंबर रोजी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. १७ सप्टेंबरच्या रात्री कमल पंजाब बार अँड रेस्टॉरंट, नावडे ब्रिजखाली या ठिकाणी आरोपी रमजान हुसेन अब्दुल जलील खान याने हद्दपार आदेशाच्या अटी आणि शर्तीचे उल्लंघन केले आणि परवानगी नसताना प्रतिबंधित केलेल्या क्षेत्रात प्रवेश केला. यावेळी सागर पाटील यांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याने पोलिसांना शिवीगाळ केली आणि तो तेथून पळून गेला.

## निवडक

### नागावमध्ये आज दिवाडकर नृत्यकलेचे आयोजन

**रायगड :** माणिक सावंत, नंदकुमार सावंत, प्रिया सावंत, वंदना सावंत, राजाराम सावंत यांच्या स्मरणार्थ दिवाडकर नृत्यकला पथकाचे आयोजन नागावमध्ये करण्यात आले आहे. बाळाराम सावंत यांच्या सौजन्याने सावंत परिवाराच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित केला आहे. नागावमधील कोठारभाट येथील बाळाराम सावंत यांच्या निवासस्थानी हा कार्यक्रम मंगळवारी (दि.२२) सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास होणार असल्याची माहिती सावंत परिवाराकडून देण्यात आली आहे. श्रीनाथ अपराध, जितेश अपराध, सुशील नाक्ती यांच्याकडून या कार्यक्रमांचे सादरीकरण होणार आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन ओवी बनकर, अनवी साळवी, श्लोक तळेकर, अथश्री साळवी यांनी केले आहे.





### वणी येथे निर्माल्यापासून खतनिर्मिती

**पाताळगंगा :** गणपती व गौरी विसर्जनानंतर नदी, तलावात निर्माल्य विसर्जित केल्याने होणारे जलप्रदूषण रोखण्यासाठी डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्या माध्यमातून यंदा विशेष उपक्रम राबविण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत खालापूर तालुक्यातील विविध गावांमधून जमा झालेले निर्माल्य श्रीसदस्यांच्या माध्यमातून एकत्रित करून त्यापासून सेंद्रिय खतनिर्मिती केली जात आहे. विसर्जनाच्या काळात मोठ्या प्रमाणात निर्माल्य नदी व जलस्रोतांमध्ये टाकले जाते. त्यामुळे पाण्याची गुणवत्ता खालावून जलचर तसेच जनावरांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेऊन निर्माल्याचा योग्य पद्धतीने पुनर्वापर करण्याचा निर्णय प्रतिष्ठानच्या माध्यमातून घेण्यात आला. खालापूर तालुक्यातील घरगुती तसेच सार्वजनिक गणेश मंडळांनी हार, फुले व इतर निर्माल्य नदीमध्ये न टाकता निर्धारित ठिकाणी जमा केले. त्यानंतर श्रीसदस्यांनी वाहनांद्वारे हे निर्माल्य वणी येथे वृक्षलागवड केलेल्या ठिकाणी नेले. तेथे खतनिर्मिती प्रकल्पाच्या माध्यमातून त्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे. निर्माल्यामधील प्लास्टिक, कापड तसेच अन्य अ-जैविक वस्तू वेगळ्या करून केवळ सेंद्रिय घटकांचा खतनिर्मितीसाठी वापर केला जात आहे.



### डेंग्यू-मलेरियाच्या पार्श्वभूमीवर धूरफवारणी

**खांदा कॉलनी :** पनवेल महानगरपालिका क्षेत्रात डेंग्यू, मलेरिया आदी डासजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजनांना वेग दिला आहे. किटक नियंत्रण कक्षामार्फत शहरातील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर धूरफवारणी आणि औषध फवारणी सुरू करण्यात आली आहे. डासांची उत्पत्ती होण्याची शक्यता असलेल्या ठिकाणांची पाहणी करून संबंधित सोसायट्या, बांधकाम व्यावसायिक तसेच दुकानदारांना आवश्यक त्या सूचना आणि नोटिसा देण्यात येत आहेत. महापालिकेच्या आकडेवारीनुसार शहरातील तब्बल ५ हजार ९९९ सोसायट्यांची नोंद करण्यात आली आहे. याशिवाय ३८९ बांधकामांची, ९३ नारळ विक्रेत्यांची, ९१ टायर पंक्चर शॉपची, ७३ नर्सरी व्यावसायिकांची आणि ८१ भंगार विक्रेत्यांची नोंद आहे. तसेच ११ तळघर, ५८ पडिक प्लॉट आणि २७ दलदलीच्या फ्लॉट्सची नोंद करण्यात आली आहे. या ठिकाणी पाणी साचून डासांची उत्पत्ती होऊ नये यासाठी पालिका प्रशासनाकडून विशेष लक्ष दिले जात आहे. विशेषतः पावसाळ्यात बांधकामांच्या ठिकाणी, सोसायटीच्या आवारात, पडिक प्लॉटवर तसेच टायर व भंगाराच्या ठिकाणी पाणी साचण्याची शक्यता असते. अशा ठिकाणी डासांची उत्पत्ती होऊन डेंग्यू व मलेरियाचा धोका वाढू शकतो. त्यामुळे संबंधितांनी आपल्या परिसरात पाणी साचणार नाही, याची दक्षता घेण्याचे आवाहन पालिकेतर्फे करण्यात आले आहे.

## हुतात्म्यांच्या शौर्याचा इतिहास होणार जागा



| चिरनेर | प्रतिनिधी |

चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या ९६ व्या. हुतात्मा स्मृतीदिन कार्यक्रमाची चिरनेर गावात तयारी सुरू आहे. चिरनेर ग्रामपंचायत, राजिप व उरण पंचायत समितीच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार( दि. २५) सप्टेंबर रोजी, चिरनेर जंगल सत्याग्रहाचा हुतात्मा स्मृतिदिन चिरनेर येथील हुतात्मा स्मृतीस्तंभाजवळ साजरा करण्यात येणार आहे. हुतात्मे धाकू गवत्या फोफेरकर, रघुनाथ मोरेश्वर न्हावी, रामा बामा कोळी, आनंदा माया पाटील, परशुराम रामा पाटील, हसूराम बुध्या पाटील, नाग्या महादू कातकरी, आलू बेमट्या म्हात्रे यांना अभिवादन करण्यासाठी पालकमंत्री भरत गोगावले, खा. श्रीरंग बारणे राजिपचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर माजी आ. मनोहर भोईर, माजी आ. बाळाराम पाटील, माजी आ. विवेक पाटील, जिल्हाधिकारी किसन जावळे, मुख्य कार्यकारी अभियंता नेहा भोसले, शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती सरपंच भास्कर मोकल यांनी दिली आहे.

## गणेश विसर्जनांसाठी वाहतूक पोलिसांचा बंदोबस्त

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

अनंत चतुर्दशीच्या दिवशी पनवेल शहरात मोठ्या प्रमाणात गणेश विसर्जन मिरवणुका निघणार आहेत. त्यामुळे वाहतूक पोलिसांकडून पुन्हा एकदा विशेष बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले आहे. विसर्जन मिरवणुकांच्या मार्गावर अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करण्यात येणार आहे. प्रमुख चौक, वर्दळीचे रस्ते आणि विसर्जन घाटांकडे जाणाऱ्या मार्गांवर विशेष लक्ष ठेवले जाणार आहे. मिरवणुकीमुळे वाहतुकीवर परिणाम होऊ नये, यासाठी आवश्यकतेनुसार वाहतूक वळविण्यात येणार आहे. अनंत चतुर्दशीच्या दिवशी विसर्जन मिरवणुका रात्री बारापर्यंत सुरू राहण्याची शक्यता आहे.या पार्श्वभूमीवर रात्री उशिरापर्यंत वाहतूक पोलिसांचा बंदोबस्त कायम राहणार आहे.



वाहनचालकांनी पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मिरवणुकीच्या मार्गावर वाहने पार्क करून वाहतुकीला अडथळा निर्माण करू नये, अशी सूचनाही देण्यात आली आहे.

मिरवणुकीदरम्यान वाहतूक व्यवस्थेला सहकार्य करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या नागरिकांनी शिस्त पाळल्यास वाहतूक सुरळीत ठेवण्यास मदत होणार आहे. गणेश भक्तांची गर्दी लक्षात घेऊन वाहतूक पोलिसांकडून परिस्थितीनुसार निर्णय घेतला जाणार आहे. वाहतूक कोंडी झाल्यास तातडीने वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलिसांची पथके सज्ज ठेवण्यात येणार आहेत.

गणेशोत्सव शांततेत आणि सुरक्षित वातावरणात पार पडावा, यासाठी पोलिस यंत्रणा सतर्क आहे. नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करून पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अनंत चतुर्दशीच्या दिवशी वाहतूक कोंडी होणार नाही, यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, अशी माहिती पनवेल शहर वाहतूक पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांनी दिली.

## पेण शहरात पार्किंगचा प्रश्न कायम

- अनधिकृत पार्किंगमुळे वाहतूक कोंडी
- नगरपालिका प्रशासनाच्या कारवाईची आवश्यकता

| पेण | प्रतिनिधी |

ऐतिहासिक शहर म्हणून ओळख असलेल्या पेण शहराची रचना पूर्वीच्या काळातील असल्याने शहराचा विस्तार आणि वाहतूक व्यवस्थेचे नियोजन आजच्या वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत अपुरे ठरत आहे. त्यातच शहरातील रस्त्यांचे काही प्रमाणात रुंदीकरण करण्यात आले असले तरी अनधिकृत पार्किंग आणि रस्त्यांवरील अतिक्रमणामुळे रुंदीकरणाचा मूळ उद्देशच हरवत चालला आहे. शहरातील प्रमुख रस्त्यांवर भाजी विक्रेते, फळ विक्रेते तसेच विविध व्यावसायिकांकडून रस्त्याच्या कडेला जागा व्यापली आहे. परिणामी, रुंदीकरण झालेले रस्तेही अनेक ठिकाणी अरुंद झाल्यासारखे चित्र दिसत आहे.



मिरची गल्लीत तर गर्दी आणि अतिक्रमणाचा प्रश्न अधिक गंभीर असल्याचे चित्र आहे. बाजारपेठेतील वाढती वर्दळ, रस्त्यालगतची दुकाने, हातगाड्या आणि अस्ताव्यस्त उभी केली जाणारी वाहने यामुळे पादचाऱ्यांनाही सुरक्षितपणे मार्ग काढणे कठीण होत आहे. शहरातील सार्वजनिक विद्यामंदिरसमोरील परिसर, अंतोरा रोड, नगरपालिका कार्यालय परिसर तसेच धर्मतर रोड या ठिकाणीही रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणात वाहने उभी असल्याचे दिसून येते.

## रिलायन्सच्या नवीन प्रकल्पामुळे चिखलाचे साम्राज्य

| नागोठणे | प्रतिनिधी |

रिलायन्स कंपनीच्या नवीन प्रकल्पाच्या सुरू असलेल्या कामामुळे नागोठणे व परिसरातील वाहन चलक व नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकल्पाच्या कामासाठी येणाऱ्या व माल वाहतूक करणाऱ्या ट्रक, डंपर, ट्रेलर, कंटेनर यासारख्या अवजड वाहनांमुळे नागोठणे-पोयनाड रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे वाहन चालक, प्रवासी आणि स्थानिक नागरिकांना दररोज मृत्यूच्या छायेतून प्रवास करावा लागत असून रात्रीच्या वेळी तर रस्त्यावरील चिखलामुळे व रस्त्यावर अनधिकृतपणे उभ्या करण्यात आलेल्या अवजड वाहनांमुळे येथे अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या, नागोठणे मॅन्युफॅक्चरिंग डिव्हिजन या प्रकल्पांतर्गत रिलायन्स कंपनीकडून नवीन प्रकल्पाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. या नवीन प्रकल्पामुळे नागोठणे परिसराला गुजरात राज्यातील जामनगर परिसरासारखे सुजलाम-सुफलाम करण्याचे गाजर कंपनी प्रशासनाकडून स्थानिकांना दाखवले जात आहे. मात्र, असे असतानाच वाहन चालकांच्या व स्थानिक नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचे वास्तव समोर आले आहे.



### स्थानिकामध्ये संतापाची लाट

सततच्या त्रासामुळे स्थानिक नागरिक आणि प्रवाशांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. संबंधित रिलायन्स कंपनीच्या व्यवस्थापनाने आणि स्थानिक वाहतूक पोलीस प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. रस्त्यावरील चिखल तात्काळ साफ करून, अवजड वाहनांसाठी आवश्यक ती पार्किंग व्यवस्था करावी आणि नागरिकांचा प्रवास सुरक्षित करावा, अशी आग्रही मागणी आता जोर धरत आहे.

## वासुदेवांमुळे बाल गोपाळांमध्ये उत्साह

| पाली / गोमाशी | प्रतिनिधी |

सुधागड तालुक्यातील गोमाशी परिसरात गणेशोत्सव काळात वासुदेव दाखल झाले. डोक्यावर मोरपिसाची टोपी, अंगात पांढरा अंगरखा, गळ्यात रुद्राक्षाच्या माळा, कपाळावर गंध आणि हातात चिपळ्या व टाळ घेऊन सकाळीच गावात प्रवेश करत आहेत. या दोन वासुदेवांनी पारंपरिक वेशभूषेत भजन म्हणत उपस्थितांचे लक्ष वेधून घेत आहेत. पूर्वी गावोगावी दिसणारी वासुदेवाची परंपरा आता हळूहळू लोप पावत चालली आहे. मात्र, आजही काही कलाकार ही लोककला जपत आहेत. घरासमोर वासुदेव आल्यावर महिला त्यांचे औक्षण करून धान्य, पैसे देतात. वासुदेवही आशीर्वाद देत पुढे मार्गस्थ होतात.सध्या पावसाळ्यात ही वासुदेव दिसू लागल्यामुळे लहान मुलांमध्ये मोठी उत्सुकता आणि आनंदाचे वातावरण आहे.



## लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केल्याप्रकरणी तालीब शेख (रा. तळोजा फेस टू) याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात १७ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील पीडित फिर्यादी यांना आरोपी तालीब शेख याने लग्न करण्याचे आमिष दाखवले आणि त्यांच्यावर अत्याचार केला. लग्न करण्यास सांगितले असता त्याने लग्न करण्यास नकार दिला आणि फिर्यादीला दमदाटी केली. याचा अधिक तपास पोलीस करत आहेत.





गणेश दर्शन स्पर्धा २०२६

आपल्या गणपतीच्या सजावटीसह फोटो पाठवा व बक्षिसे जिंका.

फोटोसाठी स्थानिक संपर्क

सुरेश खडपे (चौल) : ९९२१०५४६०६
जीवन पाटील(भाकरवड) : ७०६६८९८६३७/ ८१४९६६३८१३
संजय गायकवाड (कर्जत) : ९४२३३७७९००
समीर मालोदे (अलिबाग) : ९४२३३७५३६१
मुकुंद रांजणे (माथेरान) : ७५०७६७३८७९
अनिल गवळे (वेणगाव) : ९६८९९५४४२४
नंदकुमार मरोदे (खांब) : ८३०८६८८२२९
सलीम शेख (माणगाव) : ९४२३३८२७८९
सुधीर नाझरे (मुरुड): ९४२३३७७२४२
समीर रिसबुड (श्रीवर्धन ): ९८८१९२२८३५
दत्ता म्हात्रे : (चिरनेर) : ७२०८३७७१०५
जुनेद तांबोळी (महाड) : ८४११९२४४६२
शैलेश पालकर (पोलादपूर) :९२२६८४९१८५
कांता हाबळे (नेरळ) : ९२०९२३८७६९
राजू नेवासेकर (मुरुड) : ९९२१६२३८४८/ ८२३७१३८९७४
सुनील ठाकूर (उरण) : ८१०८९२१५६५
मुस्कान खान (पेण) : ८९२८९११३९१
राकेश खराडे (रसायनी) : ९६६५३१४११५
बी.एस. कुलकर्णी(मोहपाडा): ९८६०६०९६५४
भूषण सुतार (सुधागड) : ८१४९६६४०५८
सत्यप्रसाद आढाव (रोहा) : ८९८३४२०१६१
अब्दुल सोगावकर (सोगाव) : ९९६०४८११३३
गणेश चोढणेकर (मुरुड) : ९२६००१६३२३
वैशाली मलबारी (पेण) : ८९८३९३६४५५
अल्ताफ चोरडेकर (रोहा) : ८८०५२४९५६७
सिद्धी दाखिणकर (माणगाव) : ७४९९३११८१७
महेश पवार (नागोठणे) : ९२२५४७००३७

स्पर्धेचे स्वरूप
- आपण आमच्याकडे पाठविलेल्या गणपतीच्या फोटोला 'कृषीवल'मध्ये प्रसिद्धी दिली जाईल.
- स्पर्धा १५ सप्टेंबर ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत घेतली जाईल.

फोटो पाठविण्याची वेळ स. ११.०० ते संध्या. ५.०० वा. पर्यंत.

स्पर्धेसाठी फोटो तुम्ही कृषीवल कार्यालय, वेश्वी किंवा krushivalganesh@gmail.com या इमेलवर पाठवा
अधिक माहितीसाठी संपर्क : 8975816900/9175708906


तिसऱ्या पिढीकडून १०० वर्षांपासून परंपरा कायम | एका डावासाठी तीन ते चार तासाची अवश्यकता

## गोवे गावातील तरुणांनी जोपासला सारिपाटचा खेळ

| कोलाड | प्रतिनिधी |

आधुनिक काळात गणपती उत्सवातील अनेक पारंपारीक खेळ लोप पावत असतांना दिसत आहेत. परंतु रोहा तालुक्यातील गोवे गावातील तरुणांनी पिढ्यानं पिढ्यापासून सुरु असणारा सारिपाटचा खेळ अजून ही टिकून ठेवला असल्याचे दिसून येत आहे. हा खेळ गणेशात्सवापासून दसऱ्यापर्यंत खेळाला जात असून कोजागिरी पौर्णिमेला या खेळाची समाप्ती केली जाते. गोवे गावातील तिसरी पिढी हा खेळ खेळत असून ही परंपरा १०० वर्षांपासून सुरु आहे.



या खेळासाठी कापडी सारीपाट वापरला जात असुन सोंगट्या म्हणून लाकडी सोंगट्याचा वापर केला जात आहे. लाकडी सोंगट्या पटावर घेऊन हा खेळ सुरु होतो. हा खेळ दोन गटात खेळला जात असुन दोन्ही संघाकडे एकूण १६ (प्रत्यकी ८) सोंगट्या असतात. या खेळात १० किंवा २५ दान पडल्याशिवाय हा खेळ सुरु होत नाही.

> पूर्वी सारिपाटच्या खेळात जागरण म्हणून तरुण वर्गाचा सहभाग असायचा सध्या मात्र, तरुणांनी या खेळाकडे पाठ फिरवली आहे. संभे गावातील तरुणांप्रमाणे सारिपाट या खेळाकडे वळावे, यामुळे या खेळाची माहिती नवीन पिढीली मिळेलेल.
>
> -डॉ. मंगेश सानप, सामाजिक कार्यकर्ते, संभे

सारिपटाचा एक डाव पूर्ण होण्यासाठी तीन ते चार तास लागतात. पूर्ण जागरण होण्यासाठी दोन ते तीन डाव होतात. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात हा खेळ जागरण म्हणून खेळला जातो. गोवे गावातील लिलाधर दहिंबेकर, प्रशांत गुजर, निलेश दहिंबेकर, चंद्रकांत पवार, प्रमोद वारकर, मनोहर दहिंबेकर, बळीराम घरट, नथुराम वारकर, देवजी सुर्वे, यांनी हा खेळ जोपासला संभे येथे हा खेळ खेळला जात आहे.

# एक अनिष्ट वावटळ

टाटा उद्योगसमुहातील वाद ही एक अनिष्ट वावटळ आहे. या वावटळीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील एक भला उद्योगसमूह कोसळून पडण्याचा धोका आहे. टाटा सन्स या कंपनीच्या अध्यक्षपदावरून हिंदी टीव्ही मालिकेपेक्षाही वाईट रीतीने घमासान लढाई चालू आहे. चंद्रशेखरन हे टाटा सन्सचे सध्याचे चेअरमन सहा महिन्यांमध्ये निवृत्त होत असून आपल्याला पुढे मुदतवाढ नको असे त्यांनी नुकतेच सांगितले होते. हे अर्थातच त्यांनी स्वखुषीने केले नव्हते. तर त्यांच्या मुदतवाढीला टाटा सन्सच्या संचालक मंडळामध्ये व त्यातही नोएल टाटा यांचा विरोध आहे. चंद्रशेखर यांनी नकार देताच त्यांच्या नंतर कोण यांची शोधाशोधही सुरु झाली होती. पण आता चंद्रशेखर यांनीच पुढची पाच वर्षे चेअरमन राहावे अशी शिफारस टाटा सन्सच्या संचालकांनी केली आहे. या शिफारशीवरून आणि इतर बाबींवरून टाटा समुहामध्ये आता उभी फूट पडते की काय व हा समुह विखरून जातो की काय अशी भीती निर्माण झाली आहे. याला एक पदर असाही आहे की, टाटा सन्स ही खासगी कंपनी म्हणून राहायला खुद्द रिझर्व्ह बँकेने आक्षेप घेतला असून तिने भांडवली बाजारात यावे असे फर्मान काढले आहे. टाटा सन्सचे शेअर्स सार्वजनिक रीत्या शेअर बाजारात उपलब्ध झाले तर अदानी किंवा अंबानीसारखे मालदार लोक ते विकत घेऊन एकूण टाटा समुहावर कबजा करू शकतील अशी भीती व्यक्त होत आहे. या मुद्द्यावरूनही टाटा समुहात दोन गट पडले आहेत. टाटा समुहाची रचना नमुनेदार आहे. टाटा ज्यामुळे ओळखले जातात ते टाटा स्टील, टाटा मोटर्स आणि टेल्को, टाटा केमिकल्स, टाटा टी इत्यादी कंपन्या शेअर बाजारात नोंदलेल्या आहेत. या कंपन्यांमध्ये खुद्द टाटांचे असे भागभांडवल बराच काळ कमी होते. एक वेळ तर अशी होती की यातल्या एक-दोन कंपन्यांमध्ये बिर्लांचे भांडवल अधिक होते व मनात आणले असते तर बिर्ला ती कंपनी ताब्यात घेऊ शकले असते असे म्हणतात. रतन टाटा यांच्या काळात हे भागभांडवल वाढवण्यात आले.

### शापूरजींचा आग्रह

टाटा सन्स हा या सर्व कंपन्यांमधील सर्वात मोठा भागधारक आहे. त्या अर्थाने टेल्को, टीसीएस वगैरे वर उल्लेख केलेल्या कंपन्यांची मालकी टाटा सन्सकडे आहे. टाटा सन्सची मालकी टाटा ट्रस्टकडे आहे. पण टाटा सन्स ही मात्र खासगी कंपनी आहे. तिच्यात मोजके व टाटांशी संबंधित असे भागधारक आहेत. हा अर्थातच ट्रस्ट कायद्याखाली नोंदला गेलेला आहे. टाटा ट्रस्टमध्ये टाटा घराण्याशी संबंधित वा पारशी लोक आहेत. टाटा सन्सची मालकीही खासगी व मर्यादित लोकांकडे आहे. टाटा समुहाची एकूण उलाढाल १८५ अब्ज डॉलर म्हणजे सुमारे सोळा लाख कोटी रुपये आहे. तर तिच्या शेअर्सचे एकूण बाजारमूल्य सुमारे २६ लाख कोटी रुपये आहे. म्हणजेच या कंपनीला काहीही झाले तर भारतीय बाजार आणि अर्थव्यवस्था या दोघांनाही जबर दणका बसू शकतो. टाटा सन्स ही इतकी वर्षे एक बिगरबँकिंग वित्तीय संस्था म्हणून वावरली. अशा संस्थेचे व्यवहार पडद्याआड राहतात. शेअर बाजारात नोंदणी केलेल्या पब्लिक लिमिटेड कंपनीला हरेक बारीकसारीक व्यवहार किंवा निर्णयाची माहिती शेअर बाजार नियामक मंडळाला कळवावी लागते. ही माहिती लगोलग प्रसिध्दही केली जाते. जेणेकरून कंपनीत काय चालू आहे व ती कोणत्या दिशेने जात आहे हे भागधारकांना कळावे. हे टाळण्यासाठी टाटा सन्ससारख्या कंपन्या खासगी मालकी ठेवू इच्छितात. इतकी वर्षे ते चालून गेले. पण आता या मुद्द्यावरून दोन गट पडले आहेत. शापूरजी पालनजी यांनी शेअर बाजारात उतरण्याचा आग्रह धरला आहे. शापूरजी हे दोनतीन पिढ्यांपासून टाटांचे सहकारी आहेत. रतन टाटा पायउतार झाल्यावर टाटा सन्सचे चेअरमन झालेले सायरस मिस्त्री हे शापूरजी यांचे चिरंजीव होते. सायरस यांची नंतर रतन टाटा यांनी वादग्रस्त रीतीन हकालपट्टी केली होती. शापूरजी यांची फर्म बांधकाम धंद्यातील विख्यात कंपनी आहे. मात्र मध्यंतरी सायरस यांचा मृत्यू झाल्यानंतर ती आर्थिक अडचणीत आहे. त्यांच्यावर सुमारे ६० हजार कोटी रुपयांचे कर्ज असून त्यांना रोख पैशांची गरज आहे. त्यांचे टाटा सन्समध्ये सुमारे १८ टक्के भागभांडवल आहे. टाटा सन्स शेअर बाजारात उतरली तर या १८ टक्क्यांची किंमत सुमारे चार लाख कोटींपर्यंत जाऊ शकेल. म्हणजेच त्यातील काही शेअर्स विकून शापूरजी कर्जमुक्त होतील.

### खरा धोका

शापूरजींना शेअर बाजारात येण्याची घाई झाली आहे हे तर उघड आहे. त्यासाठी त्यांनी थेट पंतप्रधान मोदींना पत्रे लिहिली होती अशा बातम्या आहेत. रिझर्व्ह बँकेचा निर्णय आल्यावर शापूरजींनी मोदींची भरमसाठ स्तुती केली आहे हे उल्लेखनीय आहे. हा प्रश्न दोन वर्षांपासून पडून असताना रिझर्व्ह बँकेने अचानक टाटा सन्सला शेअर बाजारात उतरण्याच्या आदेश दिला. त्यामागे पंतप्रधान कार्यालयाचा दबाव आहे असे अनेक जण मानतात. असे करून भविष्यकाळात टाटाच्या कंपन्यांवर अदानीसारख्यांचा कबजा करण्याचा मार्ग मोकळा केला जात आहे की काय अशीही शंका आहे. उद्या समजा तसे झालेच तर तो आपल्या भांडवलशाहीतील काळाकुट्ट कालखंड असेल. ही मालकांमधील आपसातली भांडणे आहेत, त्याचा सर्वसामान्यांशी काय संबंध असे कोणाला वाटू शकेल. पण अंतिमतः याचा फटका कामगार, कर्मचारी आणि एक नागरिक म्हणून आपल्यालाही बसतच असतो. भांडवलशाहीमध्ये कामगारांच्या श्रमांतून संपत्ती निर्माण होते व नंतर ती एकवटत जाऊन विषमता तयार होते. पण मुळात भारतासारख्या गरीब देशात संपत्ती निर्माण होणे वा करणे हेही महत्वाचे असते. त्यामुळे भांडवलदार किंवा उद्योगपतींची भूमिका अमान्य करून चालत नाही. शिवाय, हरेक उद्योगपती म्हणजे तो अमानुष, लोकांच्या मुंड्या मुरगळणारा असतो असे नव्हे. माणुसकी बाळगणारे, किमान काही लोकशाही मूल्ये पाळणारे असेही काही उद्योगपती असतात. टाटा पॉवरचे सह्याद्रीतील काही प्रकल्प सोडले- ज्याच्या विरोधात सेनापती बापटांनी मुळशीचा सत्याग्रह उभारला व ज्याममध्ये स्थानिक शेतकऱ्यांची वाताहत झाली- तर टाटा हे सर्वसाधारणपणे स्थानिक जनता, कामगार इत्यादींचे हित पाहणारे आहेत असा अनुभव आहे. अशा उद्योगसमुहांमुळे एक मानदंड तयार होत असतो. टाटांच्या नफ्यातील बहुसंख्य हिस्सा हा धर्मादाय कामांसाठी खर्च होतो. रतन टाटा अत्यंत साध्या घरात राहत असत. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च किंवा इन्स्टिट्यूट ऑफ सायन्ससारख्या जागतिक दर्जाच्या संस्था टाटांमुळे निर्माण झाल्या. नुसता पैसा जवळ असून चालत नाही. तो अंबानी व अदानीकडे टाटांच्या दसपटीने आहे. आजवरच्या टाटांकडे एक दृष्टी होती व देशाप्रती कर्तव्यभावना होती. टाटा समुहाचा ऱ्हास झालाच तर ही परंपरा खलास होण्याचा धोका आहे. चंद्रशेखर राहणार की जाणार किंवा टाटा सन्स ही शेअर बाजारात येणार किंवा कसे याचा त्रास एरवी सामान्यांनी करून घेण्याचे कारण नाही. पण राजकीय व आर्थिक दबाव वापरून एक उदारमतवादी, लोकशाहीला पूरक संस्था संपवली जात असेल तर त्याला विरोध करायला हवा.

विचार

# 'ढगांचे घर' कोरडे कसे पडले?

**_मेघालय म्हटले, की डोळ्यांसमोर उभे राहतात धुक्याने वेढलेले डोंगर, कोसळणारे असंख्य धबधबे आणि वर्षाचे बारा महिने बरसणारा पाऊस. 'जगातील सर्वाधिक पावसाचे ठिकाण' म्हणून प्रसिद्ध असलेल्या मेघालयात यंदा मात्र सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. ही केवळ एका वर्षातील हवामानातील चूक आहे, की भारतीय मॉन्सूनच्या बदलत्या स्वभावाचा गंभीर इशारा, हा प्रश्न अलिकडच्या काळात चर्चेत राहिला आहे._**



मिलिंद बेंडाळे

ज्या राज्याची ओळखच पावसामुळे आहे, त्याच राज्यात पावसाची कमतरता भासणे ही घटना साधी नाही. कारण मेघालयातील पाऊस हा केवळ स्थानिक हवामानाचा विषय नाही, तर भारतीय मॉन्सूनची ताकद, बंगालच्या उपसागरातील आर्द्रतेचे वितरण आणि हवामानातील संतुलन यांचे प्रतीक मानला जातो. त्यामुळे मेघालयात पाऊस कमी पडणे ही संपूर्ण मॉन्सून व्यवस्थेतील बदलाची चाहूल समजली पाहिजे. भारतीय हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार ४ जून ते २८ जुलै या कालावधीत मेघालयात साधारण ६३२.१ मिलीमीटर पाऊस अपेक्षित होता. प्रत्यक्षात मात्र केवळ २७२.९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. म्हणजेच पावसात तब्बल ५७ टक्क्यांची तूट आली. विशेष म्हणजे मेघालयच नव्हे, तर आसाम, अरुणाचल प्रदेश आणि मणिपूरमध्येही सरासरीपेक्षा मोठी घट नोंदवली गेली आहे. यावरून ईशान्य भारतातील संपूर्ण मॉन्सून प्रणाली यंदा कमकुवत राहिल्याचे स्पष्ट होते. मेघालयात इतका पाऊस का पडतो, यामागे त्याची भौगोलिक रचना कारणीभूत आहे. बंगालच्या उपसागरातून येणारे दमट मॉन्सून वारे खासी, जयंतिया आणि गारो पर्वतरांगांवर आदळतात. पर्वतांवर चढताना हे वारे थंड होतात आणि त्यातील जलबाष्पाचे रूपांतर पावसात होते. हवामानशास्त्रात याला 'ओरोग्राफिक रेनफॉल' म्हणजेच पर्वतीय वर्षाव असे म्हटले जाते. या नैसर्गिक प्रक्रियेमुळे मासिनराममध्ये सरासरी ११ हजार ८०२ मिलीमीटर, तर सोहरामध्ये ११ हजार ३५९ मिलीमीटर वार्षिक पाऊस पडतो. त्यामुळेच ही दोन्ही ठिकाणे जगभर प्रसिद्ध झाली; मात्र यंदा या प्रक्रियेलाच खीळ बसल्याचे दिसते.

हवामान विभागाच्या मते, बंगालच्या उपसागरात निर्माण झालेली कमी दाबाची प्रणाली ओडिशामार्गे मध्य भारताकडे सरकली. त्यासोबतच मोठ्या प्रमाणातील आर्द्रताही पश्चिम आणि मध्य भारताकडे वळली. परिणामी, मध्य प्रदेश, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र यांसारख्या राज्यांमध्ये जोरदार पाऊस झाला; पण मेघालय आणि ईशान्य भारत मॉन्सूनच्या मुख्य सक्रिय पट्ट्याबाहेर राहिला. त्यामुळे ढगांची निर्मिती कमी झाली आणि मुसळधार पावसासाठी आवश्यक असलेली सततची आर्द्रता त्या भागात पोहोचलीच नाही. याचे पुरावे उपग्रह चित्रांमध्येही दिसून येतात. इनसॅट-३डीएस उपग्रहाच्या प्रतिमांमध्ये मध्य भारतावर दाट ढगांचे साम्राज्य दिसत असताना मेघालयावर ढग विरळ आणि तुटक दिसतात. शिलाँग हवामान केंद्राच्या निरीक्षणानुसार, जगप्रसिद्ध मासिनराम आणि चेरापुंजीमध्येही यंदा अपेक्षेपेक्षा खूपच कमी पाऊस झाला. म्हणजेच निसर्गाच्या स्वतःच्या नियमांमध्ये काहीसा बदल घडताना दिसत आहे. याचा सर्वात मोठा परिणाम शेतीवर होणार आहे. मेघालयातील बहुतांश शेती अजूनही पावसावर अवलंबून आहे. भात, मका, आले, हळद, संत्री, अननस आणि विविध फळपिकांसाठी नियमित पाऊस अत्यावश्यक असतो. पर्वतीय भागातील अनेक गावे नैसर्गिक झरे आणि डोंगराळ पाणवठ्यांवर अवलंबून आहेत. पाऊस कमी झाल्यास हे झरे आटू लागतात. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचे संकट निर्माण होण्याची भीती आहे. नद्यांमधील पाण्याची पातळी कमी होईल. भूजल पुनर्भरण घटेल आणि पुढील उन्हाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. पर्यटन क्षेत्रासाठीही ही धोक्याची घंटा आहे.

मेघालयचा अर्थच 'ढगांचे घर'. दरवर्षी लाखो पर्यटक केवळ येथील धबधबे, हिरवळ आणि मुसळधार पावसाचा अनुभव घेण्यासाठी येतात. 'नोहकलिकाई', 'सेव्हन सिस्टर्स', 'एलिफंट फॉल्स' यांसारखे धबधबे हे राज्याच्या पर्यटनाचे मुख्य आकर्षण आहेत. पाऊस कमी झाल्यास या धबधब्यांमधील प्रवाह कमी होईल आणि पर्यटन उद्योगालाही मोठा फटका बसेल. २०२५ मध्ये जवळपास १८ लाख पर्यटकांनी मेघालयला भेट दिली होती. या उद्योगावर हजारो कुटुंबांची उपजीविका अवलंबून आहे. या संपूर्ण घटनेतून हवामानबदलाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. हवामानतज्ज्ञ मात्र एका वर्षाच्या आकडेवारीवरून निष्कर्ष काढण्यास तयार नाहीत. त्यांचे म्हणणे रास्त आहे; परंतु गेल्या दोन दशकांमधील निरीक्षणे वेगळीच कथा सांगतात. भारतात पावसाचे वितरण अधिकाधिक असमान होत चालले आहे. काही भागांमध्ये विक्रमी अतिवृष्टी होते, तर काही भाग दुष्काळाच्या उंबरठ्यावर पोहोचतात. काही दिवसांमध्ये महिनाभराचा पाऊस पडतो, तर नंतर अनेक आठवडे वातावरण कोरडे राहते. ही प्रवृत्ती आता वारंवार दिसू लागली आहे. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या हवामानबदल मूल्यांकन अहवालातही याच गोष्टीची नोंद आहे. जागतिक तापमानवाढीमुळे वातावरणात अधिक जलवाष्प साठत आहे. त्यामुळे पावसाच्या घटना अधिक तीव्र होत आहेत; पण त्यांचे वितरण अधिक अस्थिर होत आहे. म्हणजेच एकाच वेळी काही भागांमध्ये पूर आणि काही भागांमध्ये दुष्काळ अशी परिस्थिती निर्माण होत आहे. यंदाच्या मॉन्सूनने हेच चित्र स्पष्ट केले आहे. आसामच्या काही जिल्ह्यांमध्ये अभूतपूर्व पूरस्थिती असताना मेघालय पावसासाठी आसुसला होता.

भारतीय मॉन्सून हा जगातील सर्वात गुंतागुंतीच्या हवामान व्यवस्थांपैकी एक आहे. 'अल-निनो', 'ला-निना', हिंद महासागरातील तापमान, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचे पट्टे, जेट प्रवाह आणि स्थानिक भौगोलिक रचना अशा अनेक घटकांवर त्याचे स्वरूप अवलंबून असते. त्यामुळे एका घटकातील छोटासा बदलही हजारो किलोमीटर दूर परिणाम घडवू शकतो, म्हणूनच मॉन्सूनचे अचूक भाकीत करणे अजूनही हवामानशास्त्रासाठी मोठे आव्हान आहे. या पार्श्वभूमीवर भारताने हवामानबदलाशी जुळवून घेण्याची तयारी अधिक वेगाने करणे आवश्यक आहे. पर्जन्यमानावर अवलंबून असलेल्या राज्यांमध्ये जलसंधारण, पावसाचे पाणी साठवणे, लहान धरणे, झऱ्यांचे पुनरुज्जीवन, भूजल पुनर्भरण आणि हवामान-स्मार्ट शेती यांना प्राधान्य द्यावे लागेल. हवामान अंदाज अधिक अचूक आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देणेही तितकेच आवश्यक आहे. एकीकडे हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यासाठी कार्बन उत्सर्जनात कपात करण्याचे जागतिक प्रयत्न सुरू आहेत; पण त्याचबरोबर बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्याची क्षमता वाढवणेही महत्त्वाचे आहे. मेघालयसारख्या राज्यांनी पर्यटन, शेती आणि जलव्यवस्थापनासाठी नव्या परिस्थितीला अनुरूप धोरणे स्वीकारली पाहिजेत. येत्या काळात येथिल परिस्थिती सुधारली, तरी यंदाचा अनुभव हवामानशास्त्र आणि धोरणकर्त्यांसाठी महत्त्वाचा धडा ठरणार आहे. त्यातून अनेक नवे निष्कर्षही पुढे येत आहेत.

मेघालयातील पावसाची तूट ही केवळ एका राज्याची बातमी नाही. त्याकडे तेवढ्याच दृष्टिकोनातून पाहणे चुकीचे ठरेल. हा भारतीय मान्सून अधिक अनिश्चित, अधिक टोकाचा आणि अधिक असमतोल होत असल्याचा स्पष्ट संकेत आहे. ज्या भूमीची ओळखच मुसळधार पावसाने आहे, तीच भूमी पावसाच्या प्रतीक्षेत राहते, हा विरोधाभास भविष्यातील हवामानसंकटाचे वास्तव अधोरेखित करतो. आज गरज आहे, ती हवामान बदलाला केवळ पर्यावरणाचा विषय न मानता विकास, अर्थव्यवस्था, शेती, जलसुरक्षा आणि राष्ट्रीय नियोजनाचा केंद्रबिंदू मानण्याची. अन्यथा, आज मेघालय कोरडे पडले आहे; उद्या देशातील इतर पर्जन्यसमृद्ध प्रदेशही अशाच अनिश्चिततेच्या भोवऱ्यात अडकू शकतात. निसर्ग वेळोवेळी इशारे देत असतो. प्रश्न एवढाच आहे की, आपण ते वेळेत समजून घेतो का?

चर्चा आजची

# मोकाट कुत्र्यांपासून सावध



प्रमोद जाधव

रायगड जिल्ह्यात मोकाट कुत्र्यांच्या संख्येत प्रचंड वाढ होऊ लागली आहे. पादचाऱ्यांसह वाहन चालकांवर एकत्रित हल्ला करण्याच्या घटना वारंवार घडत आहे. या घटनांमुळे नागरी सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. स्थानिक प्रशासनाकडून यावर ठोस उपाययोजना केल्या जात नाही. मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या संख्येमुळे नागरिकांना विशेष करून महिला, ज्येष्ठ नागरिक व शाळकरी व लहान मुलांना बाहेर पडणे कठीण झाले आहे. रात्रीबेरात्री रस्त्यावर बाजारपेठांमध्ये मोकाट कुत्रे एकजुटीने वावरत आहेत. त्याचा नाहक त्रास नागरिकांना होत आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये मोकाट कुत्र्यांचा उपद्रव जीवघेणा ठरत आहे.जानेवारी २०२५ ते ऑगस्ट २०२६ या वीस महिन्याच्या कालावधीत साडेतीन हजारहून अ धिक जणांवर मोकाट कुत्र्यांनी जीवघेणा हल्ला केला आहे. या हल्ल्यात लहान मुले, महिला व वयोवृध्द जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. त्यामध्ये दोन हजार ६५१ जणांवर बाह्य रुग्ण कक्षात उपचार केले असून एक हजार नऊ जणांना अधिक उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.त्यामुळे मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यामुळे नागरिकांना परिसरात जीव मुठीत घेऊन वावरण्याची वेळ आली आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागासह शहरी भागात ठिकठिकाणी मोकाट कुत्र्यांचा वावर वाढला आहे. रस्त्यांसह गल्लीत आणि नाक्यानाक्यावर मोकाट कुत्रे एकोप्याने राहत आहे.मिळेल ते मासांहारी अन्न पदार्थ खाऊन मोकाट कुत्रे परिसरात फिरत आहेत.गल्लीसह वसाहती,एसटी स्थानक, आणि रहिवासी भागांमध्ये मोकाट कुत्रे खुलेआमपणे फिरत असतात. लहान मुलांसह शाळकरी मुले, वयोवृध्द व महिलांमध्ये भितीचे वातावरण निर्माण होत आहे. रस्त्यावर दुचाकीवरून ये-जा करतानादेखील मोकाट कुत्रे हल्ला करण्याच्या घटना दिवसेंदिवस घडत आहेत. अलिबाग रोहा मार्गासह अलिबाग मुरूड, अलिबाग पेण अशा अनेक भागात मोकाट कुत्रांचा वावर प्रचंड वाढला आहे.जिल्ह्यात मोकाट कुत्र्यांची संख्या वेगाने वाढत आहे. वाढत्या संख्येचा प्रचंड त्रास नागरिकांना होत आहे. रस्त्याने धावणाऱ्या वाहनांवर हल्ला करणे, पादचाऱ्यांवर हल्ला करणे असे प्रकार घडत आहे. कुत्र्यांच्या हल्ल्यात दुचाकी चालक, लहान मुले, वयोवृध्द व महिला मोठया प्रमाणात सापडत आहेत. जिल्ह्यामध्ये जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत दोन हजार ११५, त्यानंतर जानेवारी ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत एक हजार ५४५ असे एकूण वीस महिन्यात तीन हजार ६६० जणांवर मोकाट कुत्र्यांनी हल्ला केला आहे. यातील दोन हजार ६५१ जणांना किरकोळ दुखापत झाल्याने त्यांच्या प्राथमिक उपचार करून सोडण्यात आले. मात्र कुत्र्यांच्या हल्ल्यामध्ये एक हजार नऊ जणांना गंभीर दुखापत झाली. त्यामुळे त्यांना अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयात अधिक उपचारासाठी दाखल केल्याची माहिती समोर येत आहे. जिल्ह्यात मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यामुळे नागरी सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ग्रामीण भागात ग्रामपंचायतींनी या मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करणे गरजेचे असताना निधी अभावी तसेच अपूऱ्या मनुष्यबळामुळे हे काम होण्यास अडथळा निर्माण झाला आहे. मोकाट कुत्र्यांवर अंकूश न राहिल्यास भविष्यात गावे, वाड्यांमध्ये मोकाट कुत्र्यांची संख्या प्रचंड वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. रायगड जिल्ह्यामध्ये जानेवारी २०२५ पासून ऑगस्ट २०२६ या कालावधीत तीन हजार ६६० जणांवर मोकाट कुत्र्यांनी हल्ला केला. या जखमींवर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार करण्यात आले आहेत. सुदैवाने मोठी जिवीतहानी टळली असली, तरी प्रशासनाकडून मोकाट कुत्र्यांवर नियंत्रण ठेवणे गरजेचे असल्याची प्रतिक्रीया उमटत आहे.रस्त्याच्या बाजूला अन्य मोकळ्या जागी मासांहरी पदार्थांसह अन्य काही पदार्थ टाकण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. या पदार्थांच्या शोधात मोकाट कुत्रे ठिकठिकाणी फिरत असतात. ग्रामीण भागासह शहरी भागात, रस्त्यांवर नाक्यानाक्यावर मोकाट कुत्र्यांचा वावर प्रचंड वाढला आहे. त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करण्याची वेळ आली आहे. सकाळच्यावेळी मॉर्नींग वॉकला जाणाऱ्या पादचाऱ्यांना यांचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रात्रीच्यावेळीदेखील बाहेर पडणे कठीण झाले आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासनासह जिल्हा प्रशासनाने मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण आणि लसीकरण करण्यावर भर देणे गरजेचे आहे. मागील दोन वर्षापुर्वी जिल्हा परिषदेने मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करण्यासाठी जिल्हा परिषद सेस फंडातून २५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता. पुण्यातील एका एजन्सीला हे काम सोपविले होते. जिल्ह्यातील८१० ग्रामपंचायतीपैकी फक्ती तीनच ग्रामपंचायतीमधील फक्त दोनशे कुत्र्यांचे लसीकरण व निर्बीजीकरण करण्यास यंत्रणेला यश आले. त्यानंतर पुन्हा ठेका काढण्यात आले. परंतू निविदा प्रक्रियेला प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेचा हा उपक्रमही फेल ठरला. त्यामुळे आगामी काळात जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरी सुरक्षेच्या दृष्टीने जिल्हा परिषद प्रशासन पुढाकार घेईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

लोकसंसद

## ऑस्कर २०२७ साठी भारताकडून 'गोंधळ' चित्रपटाची निवड!

२००४ मध्ये 'श्वास', २००९ मध्ये 'हरिश्चंद्राची फॅक्टरी' आणि २०१५ मध्ये 'कोर्ट' या चित्रपटानंतर आता तब्बल ११ वर्षांनंतर संतोष डावखर दिग्दर्शित 'गोंधळ' या मराठी चित्रपटाला ९९ व्या अकादमी पुरस्कारांसाठी (ऑस्कर पुरस्कार २०२७) भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान मिळाला आहे. फिल्म फेडरेशन ऑफ इंडियाच्या १४ सदस्यीय ज्युरी कमिटीने विविध भारतीय भाषांमधील 'धुरंधर', 'बॉर्डर २', 'हनुमान अंश', 'इक्कीस', नागा भाषेतील 'अंग' आणि तामिळ चित्रपट 'डोरोथी' यांसारख्या बहुचर्चित ३३ चित्रपटांमधून 'गोंधळ' या मराठी चित्रपटाची निवड केली हे विशेष! मराठी चित्रपटांमध्ये नेहमीच आशयघनता आणि दर्जेदार कथानक असते यावर 'गोंधळ'च्या निवडीमुळे पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. आता अपेक्षा एवढीच आहे की 'गोंधळ' चित्रपटाला अंतिम पाच नामांकनामध्ये स्थान मिळून ऑस्कर पुरस्कार लाभावा. कारण यापूर्वीचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडलेले तिन्ही मराठी चित्रपट ऑस्करच्या अंतिम पाच नामांकनापर्यंत पोहोचू शकले नाहीत. भारताच्या चित्रपट इतिहासात आतापर्यंत मदर इंडिया (१९५७), सलाम बॉम्बे (१९८८) आणि लगान (२००१) केवळ या तीन चित्रपटांना ऑस्करच्या अंतिम पाच नामांकनांमध्ये स्थान मिळवण्यात यश आले होते. आता तब्बल २५ वर्षांनंतर 'गोंधळ' चित्रपट त्या ऐतिहासिक चित्रपटांच्या पंक्तीत स्थान मिळवेल आणि भारतासाठी पहिला 'सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपटा'चा ऑस्कर पुरस्कार घेऊन येईल अशी आशा करूया!

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहचवणारे : कर्मवीर भाऊराव पाटील

बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज जयंती. त्यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले, तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले. शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले तिथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्धना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगावात दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या. वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजना सुरू केली. या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या. १९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सदगुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, (२७ मुलींसाठी) ३८ वसतिगृह शाळा, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, (१ मुलींसाठी) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेचा विस्तार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या रोपट्याचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डि. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची १३९वी जयंती. जयंतीदिनी कर्मवीर भाऊराव पाटलांना विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२२ सप्टेंबर**

१) श्रीम.चारूशीला शरद कोरडे
श्रीबाग-२, अलिबाग
२२-०९-१९५१

२) श्री.अचुत श्रीनिवास मळगी
वेश्वी, अलिबाग
२२-०९-१९५६

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक,कृषीवल**

## बाळू खांडेकर यांचे निधन

**कोलाड :** रोहा तालुक्यातील वरवडे (पाले) येथील बाळू धर्मा खांडेकर यांचे सोमवारी (दि.१४) निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८७ वर्ष होते. ते सामाजिक कार्यात नेहमी सक्रिय होते.



त्यांच्या मृत्यूची वार्ता समजताच त्यांच्या अंत्यदर्शनासाठी त्यांचे नातेवाईक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील असंख्य नागरिक उपस्थित होते. त्यांच्या पश्चात तीन मुलगे, तीन सुना, एक मुलगी, नातवंडे तसेच मोठा खांडेकर परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी बुधवार दि.२३ सप्टेंबर रोजी उद्धर रामेश्वर, पाली सुधागड येथे तर उत्तरकार्य विधी गुरुवार दि.२४ सप्टेंबर रोजी वरवडे (पाले) येथील त्यांच्या राहत्या निवास्थानी होणार आहेत.

## ऑनलाईन फसवणूक

**पनवेल :** क्रेडिट कार्डमधून १ लाख ६७ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञाता विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. उमेश कुमार ढाकणलाल हे बालाजी सिम्फनी, सुकापुर येथे राहतात. ते त्यांच्या क्रेडिट कार्डचा वापर ऑनलाइन खरेदीसाठी करतात. त्यांच्या मोबाईल फोनवर अज्ञाताने वेगवेगळ्या कंपनीच्या नंबरवरून मोठ्या प्रमाणात ओटीपी पाठवले आणि त्यांच्या फोनचा नकळत ॲक्सेस घेतला आणि बँकेच्या क्रेडिट कार्डच्या माहितीचा वापर करून कल्याण ज्वेलर्सच्या गोल्ड कॉइन खरेदी, गिफ्ट कार्ड खरेदी करण्यासाठी त्यांच्या क्रेडिट कार्डमधून एक लाख ६७ हजार रुपये डेबिट केले आणि त्यांची फसवणूक केली.

# नाल्यालगतच्या घरांची सुरक्षितता धोक्यात

## • कायमस्वरूपी आरसीसी गटार उभारण्याची मागणी

**| रसायनी | प्रतिनिधी |**

**श्रीमलंग डोंगर परिसरातून पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात वाहून येणाऱ्या पाण्यामुळे वावंजे गावातील प्रबुद्ध नगर-बौद्धवाडा परिसरातील सुमारे ३५ ते ४० घरांना धोका निर्माण झाला असल्याचा दावा स्थानिक नागरिकांनी केला आहे. पावसाचा जोर वाढल्यानंतर नाल्यातून मोठ्या वेगाने पाणी वाहत असल्याने काही ठिकाणी पाणी घरांमध्ये तसेच समाजमंदिर परिसरात शिरत असल्याची समस्या निर्माण झाली आहे.**

श्रीमलंग डोंगर परिसरातील पावसाचे पाणी पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या नाल्यातून वावंजे गावातून पुढे तलोजा खाडीत जाऊन मिळते. मात्र, पावसाळ्यात नाल्यातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह होत असल्याने नाल्यालगतच्या घरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.



नाल्यालगत असलेल्या काही घरांच्या जोती, भिंती, आरसीसी कॉलम तसेच फाउंडेशनवर पाण्याचा सतत मारा होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पाण्याचा प्रवाह कायम राहिल्यास भविष्यात घरांच्या पायाभरणीवर परिणाम होण्याची शक्यता स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

या समस्येवर तात्पुरत्या उपायांऐवजी कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. नाल्याचा नैसर्गिक प्रवाह अबाधित ठेवून, आवश्यक त्या ठिकाणी मजबूत आरसीसी गटार उभारल्यास पावसाचे पाणी सुरक्षितपणे पुढे वाहून नेता येईल, अशी मागणी करण्यात येत आहे.

प्रबुद्ध नगर-बौद्धवाडा तसेच वावंजे गावातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद तसेच संबंधित लोकप्रतिनिधींनी या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करावी. आवश्यक निधी उपलब्ध करून नाल्याचे आरसीसी गटारात रूपांतर करण्याचे काम हाती घ्यावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. पावसाचे पाणी घरांमध्ये शिरल्यानंतर किंवा कोणतीही दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा प्रशासनाने वेळीच उपाययोजना करणे गरजेचे आहे. नाल्याची पाहणी, पाण्याच्या प्रवाहाचे नियोजन आणि धोकादायक ठिकाणी आरसीसी गटाराचे बांधकाम तातडीने करण्यात यावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

### ‘दुर्घटना घडण्यापूर्वी उपाययोजना करावी’

वावंजे प्रबुद्ध नगर-बौद्धवाड्यातून वाहणाऱ्या नाल्यात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी वाहत असल्याने नाल्यालगतच्या घरांना धोका निर्माण झाला आहे. यामुळे वित्तहानीसह जीवितहानीची शक्यता नाकारता येत नाही. संबंधित प्रशासनाने तत्काळ उपाययोजना करून कायमस्वरूपी आरसीसी गटाराची व्यवस्था करावी. भविष्यात कोणताही अनर्थ घडू नये, यासाठी प्रशासनाने वेळीच कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे मत वावंजे येथील रमाई महिला मंडळाच्या अध्यक्षा हर्षाली पवार यांनी मांडले.

## अलीजा खेडेकरला डॉक्टर पदवी

**| रोहा | प्रतिनिधी |**

रोहा खालचा मोहल्ला विभागातील सामाजिक कार्यकर्ते आणि रोहा एज्युकेशनल अँड वेल्फेअर असोसिएशन संस्थेचे सदस्य जावेद अब्बास खेडेकर यांची मुलगी अलीजा खेडेकर हिने कर्नाटक राज्यातील येनेपोया होम्योपॅथिक मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल येथून बीएचएमएस डिग्री परीक्षा उत्तीर्ण होऊन वैद्यकीय क्षेत्रात यशस्वी गरुडझेप घेतली आहे.

अलीजा हिने १५०० पैकी ९४४ गुण मिळवत डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार केले आहे.



तिच्या या यशामागे तिच्या आई वडिलांनी दिवस-रात्र केलेली मेहनत तितकीच मोठी आहे. आई वडिलांनी परिस्थितीशी संघर्ष करत अनेक अडचणींवर मात करत आपल्या मुलीला उच्च शिक्षण दिले. तिच्या स्वप्नांना बळ दिले आणि आज तिला डॉक्टर म्हणून उभे केले. आई वडिलांसाठी यापेक्षा मोठा अभिमानाचा क्षण कोणता असू शकतो. अलिजा हिने डॉक्टर पदवी मिळविल्याबद्दल मुस्लिम फ्रेंडस सर्कलच्या वतीने शाल श्रीफळ व पुष्प करंडक देऊन तिचा सन्मान करण्यात आला.

## विजेच्या धक्क्याने तरुणाचा मृत्यू

**| मुंबई | प्रतिनिधी |**

जोगेश्वरी पूर्वेत गौरी-गणपती विसर्जन सुरू असतानाच मोठी दुर्घटना घडली. श्याम नगर तलावाजवळील कृत्रिम तलावात १९ वर्षीय रोहित भीमसिंग राठोड याला विजेचा तीव्र धक्का लागला आणि त्याचा मृत्यू झाला. जोगेश्वरी पूर्वेतील ट्रॉमा केअर हॉस्पिटलजवळ श्याम नगर तलाव परिसरात गणेशोत्सवानिमित्त कृत्रिम विसर्जन तलाव तयार करण्यात आला होता. शनिवारी सायंकाळी येथे गौरी-गणपती विसर्जनासाठी नागरिकांची गर्दी झाली होती. याच ठिकाणी रोहित राठोड (१९) हा तरुण विसर्जनासाठी आला होता. विसर्जनाची प्रक्रिया सुरू असताना तलावातील पाणी किंवा परिसरातील विद्युत यंत्रणेतून वीज प्रवाह उतरल्याची घटना घडली. पाण्यात असलेल्या रोहितला अचानक जोरदार विजेचा धक्का बसला. या दुर्घटनेत तो गंभीररीत्या भाजला. घटनेनंतर उपस्थित नागरिकांनी रोहितला तातडीने जवळच्या ट्रॉमा केअर हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासल्यानंतर त्याला मृत घोषित केले. या घटनेप्रकरणी मेघवाडी पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## पोलीस पाटलांच्या घरातच चोरी

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

ऐन गणेशोत्सवाच्या धामधुमीत महामार्गालगत खरवते-वाणीवाडी येथील खरवते गावच्या पोलीस पाटील सानिका गोरे यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी डल्ला मारला. यात सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा सुमारे ६७ हजार ४६८ रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. चोरीस गेलेल्या मुद्देमालामध्ये १४ हजार ५९५ रुपये किमतीचे चार ग्रॅम वजनाचे सोन्याचे इयरिंग जोड, ३ हजार ९८७ रुपये किमतीची तीन ग्रॅम वजनाची सोन्याची व हिऱ्याची कुडी, २ हजार ९०० रुपये किमतीचे दोन ग्रॅम वजनाचे सोन्याचे व हिऱ्याचे प्रेस इयरिंग, २ हजार १०० रुपये किमतीची अडीच ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, ३ हजार २२० रुपये किमतीच्या एक ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या मुद्या, ५ हजार ४१ रुपये किमतीचे आठ तोळे वजनाचे चांदीचे पैंजण आणि ३० हजार रुपयांची रोख रक्कम, असा एकूण ६७ हजार ४६८ रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे.

ही चोरीची घटना शुक्रवारी (दि.१८) सायंकाळी ते शनिवारी (दि.१९) सकाळच्या दरम्यान घडली. या प्रकरणी सानिका संतोष गोरे यांनी राजापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक अमित यादव यांनी पथकासह घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली व पंचनामा केला. चोरीचा तपास करण्यासाठी तातडीने श्वानपथक व ठसे तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले असून अधिक तपास सुरू आहे.

## उत्सव चौकात आकर्षक रंगीबेरंगी कारंजे

**| खांदेश्वर | प्रतिनिधी |**

खारघर शहराच्या सौंदर्यात दिवसेंदिवस नवनवीन भर पडत आहे. उत्सव चौक परिसरात पनवेल महानगरपालिकेच्या वतीने खास पाण्याचे कारंजे उभारण्यात आले आहे. फुटपाथच्या कडेला उभारण्यात आलेले हे कारंजे सध्या नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे.



कारंज्यात रंगीबेरंगी विद्युत दिव्यांची आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे. सायंकाळ होताच दिव्यांच्या प्रकाशात पाण्याचे उडणारे तुषार मनमोहक दृश्य निर्माण करतात. त्यामुळे या परिसराला रात्रीच्या वेळी वेगळेच सौंदर्य प्राप्त होत आहे.

परदेशातील शहरांमध्ये रस्त्यांच्या कडेला पाहायला मिळणाऱ्या कारंजांची आठवण या निमित्ताने खारघरकरांना होत आहे.

विशेषतः तरुणाईसाठी हे कारंजे आकर्षणाचे केंद्र बनले आहे. कारंज्याच्या पार्श्वभूमीवर सेल्फी आणि छायाचित्रे काढण्यासाठी तरुणांची गर्दी होत आहे. सायंकाळच्या वेळी कुटुंबांसह फिरायला येणाऱ्या नागरिकांनाही हे दृश्य भावत आहे. रस्त्याच्या कडेला असलेल्या या कारंज्यामुळे उत्सव चौक परिसराची शोभा वाढली आहे. खारघरची ओळख आधुनिक आणि नियोजनबद्ध शहर म्हणून निर्माण होत असताना सुशोभीकरणाच्या कामांना महत्त्व प्राप्त झाले आहे. या कारंज्यामुळे नागरिकांना काही क्षण प्रसन्न वातावरणाचा अनुभव मिळत आहे.

रंगीबेरंगी रोषणाई आणि पाण्याच्या तुषारांमुळे रात्रीचा उत्सव चौक अधिकच खुलून दिसत आहे. शहरातील इतर प्रमुख चौक आणि मार्गांचेही अशाच पद्धतीने सुशोभीकरण करण्यात यावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## गणेशोत्सवात आदिवासी महिलांना रोजगाराची संधी

### ■ भाजीपाल्यासह विविध फळांच्या विक्रीतून हजारोंची आर्थिक उलाढाल

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आदिवासी महिलांना रोजगाराची चांगली संधी उपलब्ध झाली. दुर्वा, बेल, केळीची पाने, विविध प्रकारची फुले, गावठी भाजीपाला, पपनीस तसेच विविध फळांची विक्री करून या महिलांनी आर्थिक उत्पन्नाचा मार्ग निर्माण केला आहे.

गणपती उत्सवासाठी दुर्वा, बेलपत्र, फुले यांना मोठी मागणी असते. याचबरोबर गावाकडील ताजा भाजीपाला व हंगामी फळांनाही ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. आदिवासी महिला जंगल परिसरातून उपलब्ध होणाऱ्या नैसर्गिक वस्तू तसेच शेतातील उत्पादनांची विक्री करून उत्सवाच्या काळात चांगली आर्थिक उलाढाल करीत आहेत.



(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

गणेशोत्सवाच्या काळात बाजारपेठांमध्ये नागरिकांची मोठी गर्दी होत असल्याने महिलांना थेट ग्राहकांपर्यंत आपला माल विकण्याची संधी मिळत आहे. त्यामुळे त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात हातभार लागत असून, स्वावलंबनालाही चालना मिळत आहे.

गणपती उत्सवाच्या निमित्ताने पारंपरिक व स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ मिळत असून, आदिवासी महिलांच्या कष्टातून हजारो रुपयांची आर्थिक उलाढाल होत आहे. त्यामुळे उत्सव हा केवळ धार्मिक श्रद्धेचा सोहळा न राहता स्थानिक महिला व कुटुंबांसाठी रोजगाराचे साधन ठरत आहे. या उपक्रमामुळे महिलांना घराजवळच रोजगार उपलब्ध झाला असून त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नातही भर पडली आहे.

**८० हून अधिक स्वयंसेवकांचा सहभाग | २८० किलो कचरा संकलित**

## नांदगाव येथे सागर स्वच्छता, जनजागृती उपक्रम

**| तळा | प्रतिनिधी |**

नांदगाव येथे शुक्रवारी (दि.१८) किनारा स्वच्छता व जनजागृती उपक्रमाचे आयोजन इनकाईस, हैद्राबाद आणि प्राणिशास्त्र विभाग, जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा रायगड आणि नांदगाव ग्रुप ग्राम पंचायत नांदगाव मुरुड यांच्या संयुक्त विद्यमाने नांदगाव येथे स्वच्छ सागर, सुरक्षित सागर या थीम द्वारे सागर स्वच्छता करण्यात आले होते. या उपक्रमात शैक्षणिक संस्था, मच्छीमार संघटना, उद्योग तसेच स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमास इन्कोइसचे संशोधक व वैज्ञानिक डॉ. लक्ष्मीकांत ढगे यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले आहे. कार्यक्रमाच्या अनुषंगाने इन्कोइस, पृथ्वी विज्ञान मंत्रालय प्रकल्पाचे डॉ. बी. जी. भवरे यांनी इनकोईसची सेवा व कार्यांविषयी संक्षिप्त सादरीकरण केले. यामध्ये सागरी माहिती सेवा आणि किनारी समुदायांसाठी त्यांचे महत्त्व याबाबत माहिती देण्यात आली.




या स्वच्छता उपक्रमात जवळपास ८०हून अधिक स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. सहभागाच्या सामूहिक प्रयत्नातून समुद्रकिनाऱ्यावरून २८० किलोहून अधिक कचरा, सुमारे २० गोण्यांमध्ये, संकलित करण्यात आला. या उपक्रमात श्री. छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयचे विद्यार्थी, ग्रामस्थ, मच्छिमार मोठया संख्येने उपस्थित होते. सहभागी व्यक्तिंची सागर स्वच्छते विषयी प्रतिज्ञा घेण्यात आली आहे

या उपक्रमाची निष्कर्ष येथील या उपक्रमातून किनारी व सागरी पर्यावरणाच्या संवर्धनासाठी सामूहिक सहभागाचे महत्त्व अधोरेखित झाले. ८० हून अधिक सहभागींचा सहभाग आणि २८० किलोहून अधिक कचऱ्याचे संकलन हे किनारा स्वच्छता व पर्यावरण संवर्धनासाठी विविध घटकांच्या एकत्रित प्रयत्नांचे महत्त्वपूर्ण उदाहरण ठरले.

**स्वच्छ किनारे, निरोगी महासागर आणि शाश्वत भविष्यासाठी एकत्रित प्रयत्न!**

या कार्यक्रमासाठी नांदगाव ग्रामपंचायतच्या सरपंच सेजल घुमकर, मच्छिमार अनिल साखळकर, माजी सरपंच अस्लम हलडे, केतन दळवी, सागर राऊत इत्यादी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी साठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे, संस्थेचे चेअरमन नंदकुमार वेदक, उन्मेष वेदक, पुरुषोत्तम मुळे, डॉ. नानासाहेब यादव यांच्या मार्गदर्शनाने आणि डॉ. एस. एस. मिर्झा, डॉ. एस. व्हि. जामदार यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला आहे. कार्यक्रमचे सूत्रसंचालन प्रकाश सरपाटील आणि आभार डॉ. बी. जी. भवरे यांनी मानले आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# निवडक




## गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ

**पाली/बेणसे :** स्वदेस फाउंडेशन आणि कौशल्य विकास भागीदार लर्ननेट स्किल्स यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रा.पं. शिळोशी येथे ४५ दिवसीय गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यात सुधागड तालुक्यातील मढाळी आदिवासीवाडी, शिळोशी कातकरवाडी, उसर ठाकूरवाडी मिळून २१ प्रशिक्षणार्थींचा सहभाग असणार आहे. ग्रामीण भागातील युवकांना बांधकाम क्षेत्राचे शास्त्रोक्त व व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना स्वयंरोजगार व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या प्रशिक्षणानंतर प्रशिक्षणार्थ्यांचे मुख्य म्हणजे रोजगारासाठी जे स्थलांतर होत होते, ते थांबण्यासाठी मदत होणार आहे. तसेच, आता मोठ्या प्रमाणात बांधकाम क्षेत्र वाढत आहे. त्यामुळे त्यांना आपल्याच तालुक्यामध्ये हजार ते बाराशे रुपये मजूरी उपलब्ध होऊ शकते. त्यांचे कुटुंब इथे राहून सुद्धा व्यवस्थित चालू शकते व त्यामुळे त्यांच्या मुलांच्या शैक्षणिक परिस्थितीमध्ये देखील भविष्यामध्ये बदल दिसून येईल. या उद्घाटन समारंभास स्वदेस फाउंडेशनचे उपसंचालक मा. तुषार इनामदार, उपमहाव्यवस्थापक मा. नजीर शिकलगार, वरिष्ठ व्यवस्थापक मा. शिवतेज ढऊळ, सहाय्यक व्यवस्थापक मा. भीमराव भालेराव, वरिष्ठ समन्वयक मा. किरण खेडेकर, लर्ननेटचे समन्वयक मा. राहुल शिर्के, प्रशिक्षक मा. प्रेम कुमार मेघवाल, गाव विकास समितीचे पदाधिकारी, ग्रामस्थ व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.



## गरजू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

**चिरनेर :** गणपती सणाचे औचित्य साधून येथील भवानी फाऊंडेशनच्यावतीने चिरनेर शाळेतील गरीब, गरजू २०० विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. भवानी फाऊंडेशन विविध सामाजिक क्षेत्रातील गरजूंना मदतीसाठी पुढाकार घेत आहे. नुकतेच फाऊंडेशनच्या वतीने दहा लाख खर्चून अमरनाथ येथील कर्नाटक वैभव नमस्ते संस्थेच्या नीजलिंगाप्पा कन्नड पीआर विद्यालयाच्या मुली आणि मुलांसाठी दहा सिटचे स्वच्छतागृह बांधून देण्यात आले आहे. चिरनेर येथील पी.पी. खारपाटील व नीजलिंगाप्पा कन्नड पीआर विद्यालयाच्या शाळेतील २०० विद्यार्थ्यांना गणवेश वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी १० ते १५ वर्ष काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचाही उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मान्यवरांसह भवानी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष के.डी. शेट्टी, भवानी शिपिंग मॅनेजिंग डायरेक्टर जीक्सीत शेट्टी, संस्थेचे अध्यक्ष नवीन शेट्टी, सचिव शिखा शेट्टी, सरिता शेट्टी, कर्मचारी वर्ग आदी उपस्थित होते.

## गणेशोत्सवानिमित्त समाजोपयोगी उपक्रम

**पनवेल :** श्री गणेशोत्सवानिमित्त साई कृपा मित्र मंडळाच्या वतीने यंदाही विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंडळाच्या वतीने एनसीएमसी कार्ड तसेच क्लाउड डेंटिस्ट एक्सप्रेस क्लिनिकच्या माध्यमातून दंत चिकित्सा शिबीर घेण्यात आले. गणेशोत्सवाच्या काळात भक्तीबरोबरच समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची परंपरा मंडळाने यंदाही कायम ठेवली आहे. साई कृपा मित्र मंडळाचा गणपती नवसाला पावणारा म्हणून परिसरात ओळखला जातो. त्यामुळे दरवर्षी गणेशोत्सवात मंडळाच्या गणरायाच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत असते. मंडळाकडून दरवर्षी गणेशोत्सवाच्या निमित्ताने वेगवेगळ्या देवतांच्या प्रतिकृतीच्या रूपात आकर्षक सजावट केली जाते. यंदा खंडेरायाच्या रूपात उभी असलेली गणरायाची मूर्ती हे विशेष आकर्षण ठरले आहे. गणेशोत्सवापुरते धार्मिक कार्यक्रम न ठेवता मंडळाकडून वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. दरवर्षी नेत्र चिकित्सा शिबीर, लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा आणि रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. या उपक्रमांना परिसरातील नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.



## गुरुसंकल्प मंडळाचे सामाजिक उपक्रम

**पनवेल :** सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजाशी नाते जोडणारे गुरुसंकल्प सांस्कृतिक मंडळ यंदा २०व्या वर्षात पदार्पण करत आहे. गेल्या दोन दशकांपासून मंडळाच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. मंडळाच्या माध्यमातून दरवर्षी योग शिबिराचे आयोजन केले जाते. तसेच गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांच्या शिक्षणाला हातभार लावला जातो. नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचेही आयोजन करण्यात येते. सामाजिक बांधिलकी जपत वर्षभर विविध उपक्रम राबविण्याची परंपरा मंडळाने कायम ठेवली आहे. गुरुसंकल्प सांस्कृतिक मंडळाच्या गणेशोत्सवातील शेवटच्या दिवसाची मिरवणूक ही विशेष आकर्षण ठरते. या मिरवणुकीत कोणताही धांगडधिंगा किंवा अनावश्यक गोंधळ न करता पारंपरिक आणि सांस्कृतिक पद्धतीने गणरायाला निरोप दिला जातो. विशेष म्हणजे मिरवणुकीत गुलाल उधळण्याऐवजी गणरायावर आणि सहभागी भाविकांवर पुष्पवृष्टी केली जाते. त्यामुळे पर्यावरणपूरक आणि शांततापूर्ण विसर्जन मिरवणुकीचा आदर्श मंडळाने निर्माण केला आहे. सामाजिक जाणीव, संस्कृतीचे जतन आणि गरजूंसाठी मदतीचा हात या त्रिसूत्रीवर मंडळाचे काम सुरू आहे. २०व्या वर्षातही विविध समाजोपयोगी उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा मंडळाचा प्रयत्न आहे.



# वृद्ध कलावंतांचा शासनाला विसर

## || मासिक मानधनाची कलावंतांना प्रतीक्षा || निवड समितीची बैठकीला मुहूर्त मिळेना

**| नेरळ | प्रतिनिधी |**

शासनाने साहित्यिक आणि वृद्ध कलावंतांना मासिक मानधन देण्यासाठी राजर्षि शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक आणि कलावंत सन्मान योजना सुरु केली आहे. रायगड जिल्हाधिकारी अध्यक्ष असलेल्या या समितीची मार्च २०२६ नंतर बैठकच झालेली नाही.त्यामुळे जिल्हाधिकारी यांच्याकडून अशी बैठक आयोजित केली जाणार काय? असा प्रश्न कलावंत उपस्थित करीत आहेत.



२००४ मध्ये राज्य सरकारने ज्येष्ठ साहित्यिक आणि वृद्ध कलावंत यांच्यासाठी योजना आणली. त्यात निकषानुसार ज्येष्ठ साहित्यिक आणि वृद्ध कलावंत यांच्यासाठी मासिक मानधन देणारी हि योजना असून मार्च २०२५ नंतर मार्च २०२६ मध्ये या योजनेची बैठक झाली आहे.या योजेतील लाभार्थी यांना गतवर्षी पासून ऑनलाईन अर्ज करण्याचे बंधन आहे. ६० वर्षे पुढे वयोमान असलेल्या कलावंत यांना पेन्शन देण्याची हि योजना असताना या योजनेचे लाभार्थी होण्यासाठी शासनाने ऑनलाईन अर्ज करण्याची ठेवलेली अट चुकीची असल्याचे वृद्ध कलावंत यांचे म्हणणे आहे. कलावंतांच्या वयाचा विचार करता कलावंत यांना ऑफलाईन अर्ज करण्याची किंवा शासनाच्या तालुका स्तरीय कार्यालयात अर्ज भरून घेण्यासाठी एक कक्ष निर्माण केले असते तर खऱ्या अर्थाने वृद्ध कलावंत यांची सेवा झाली असती.मात्र ऑनलाईन अर्ज करण्यासाठी असलेले पोर्टल सतत बंद असल्याने वृद्ध कलावंत यांना अर्ज दाखल करण्यात अनेक अडचणी आल्या आहेत. दुसरीकडे शासनाने जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांना बैठक घेण्याचे अधिकार दिले आहेत. जिल्हाधिकारी यांच्या कामाचा पसारा लक्षात घेता अशा समित्यांची जबाबदारी अन्य अधिकाऱ्यांवर देण्याची गरज पुढे आली आहे.

मार्च २०२६ मध्ये राजर्षि शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक वृद्ध कलावंत संक्रमण योजनेच्या बैठकीत १०० अर्ज मंजूर केले गेले. रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यातून १०० अर्ज मंजूर झाले असून एकट्या कर्जत तालुक्यात मार्च २०२६ चे बैठकीनंतर देखील साधारण १६७ अर्ज प्रलंबित राहिले आहेत.तर एप्रिल २०२६ पासून आजपर्यंत एकट्या कर्जत तालुक्यात ६९ वृद्ध कलावंत आणि ज्येष्ठ साहित्यिक यांचे अर्ज ऑनलाईन झालेले आहेत.त्यामुळे वृद्ध कलावंत यांना न्याय देण्यासाठी शासनणे तात्काळ जिल्हा समितीची बैठक घेऊन संक्रमण योजनेसाठी प्राप्त झालेल्या अर्जांन्वर निर्णय घ्यावा अशी मागणी पुढे आली आहे. कर्जत तालुक्यातील वृद्ध कलावंत यांनी जिल्हाधिकारी यांना विनंती केली असून समितीची बैठक लवकरात लवकर घेऊन न्याय द्यावा अशी मागणी केली आहे.

> आमच्या समितीला दरवर्षी १०० प्रस्ताव मंजूर करण्याचा अधिकार शासनाने दिला आहे.१०० प्रस्ताव हि अट शासनाने शिथिल करावी, अशी आम्ही मागणी करीत असतो. ऑनलाईन आणि ऑफ लाईन यामध्ये अनेक कलावंत यांना अर्ज करता आले नाहीत आणि तरीदेखील ज्यांचे अर्ज परिपूर्ण आहेत त्यांना मार्चनंतर बैठक झाली नसल्याने प्रस्ताव मंजुरीत अडचणी येत आहेत.
>
> कैलास भोईर, समिती सदस्य

> राजर्षि शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक आणि कलावंत सन्मान योजनेचे १३मार्च २०२६ रोजी झालेल्या बैठकीत कर्जत तालुक्यातील ३७ प्रस्ताव मंजूर झाले आहेत. त्या ३७ लाभार्थी यांच्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी एक कर्मचारी कर्जत पंचायत समिती कार्यालयात नेमण्यात आला आहे. मधल्या काळात एसआयआरचे काम सुरू असल्याने संबंधित कर्मचाऱ्यावर अन्य जबाबदारी होती,मात्र आता त्या कर्मचाऱ्यांकडून सर्व मंजूर अर्जाची पूर्तता करून घेण्याचे काम सुरु केले आहे.
>
> सुशांत पाटील
> गटविकास अधिकारी कर्जत



मुरूड समुद्रकिनारी पर्यटनाचा हंगाम सुरू झाला नाही. समुद्र शांत आणि स्वच्छ आहे. किनारी घोडेवाले पर्यटकांची वाट पाहत आहे. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## निर्माल्य संकलनासाठी कंत्राटी कामगार तत्पर

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

गणेशोत्सवाच्या पाच दिवसांच्या काळात प्रमुख रस्त्यांवरील अनेक स्ट्रीट लाईट बंद असल्याने नागरिकांसह गणेशभक्तांना अंधारातून मार्गक्रमण करावे लागत असल्याचे दिसून आले. उत्तर वाहिनी सावित्री नदीच्या घाटावर विसर्जन काळात कंत्राटी कामगार निर्माल्य संकलनासाठी सर्वत्र तत्पर असल्याचे दिसत होते.

पोलादपूर शहरातील साफसफाई व शहर स्वच्छता खासगी ठेकेदार करीत असताना दीड दिवसांच्या गणपतींचे आणि पाच दिवसांच्या गौरी गणपती विसर्जनाच्या ठिकाणी निर्माल्य संकलनासाठी कंत्राटी कामगारांना नियुक्त करण्यात आले. सावित्रीच्या संगमावर थेट कचरा सोडणाऱ्या नगरपंचायत प्रशासनाने निर्माल्य नदीत जाण्याआधीच गोळा करून ठेवण्याचा प्रयत्न केला. शिदोरीच्या प्लास्टिक पिशव्या आधीपासूनच सावित्री नदीच्या पात्रात तरंगत असल्याचे पाहण्यास मिळाले.

## जात प्रमाणपत्रासाठी विशेष शिबिराचे आयोजन

**| रायगड | प्रतिनिधी |**

सेवा संकल्प अभियान कालावधीत इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेतील प्रवेशित विद्यार्थी तसेच सन २०२६-२७ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रलंबित प्रकरणांतील त्रुटींची पूर्तता करण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या अनुषंगाने जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, रायगडमार्फत विशेष शिबीर आयोजित करण्यात आले आहे. समितीस्तरावर प्रलंबित प्रकरणामधील आवश्यक कागदपत्रे व अन्य त्रुटींची पूर्तता करून प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यासाठी विद्यार्थ्यांना या शिबिराच्या माध्यमातून सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शिक्षणातील प्रवेश प्रक्रिया लक्षात घेता विद्यार्थ्यांनी प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करून घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## मारहाण केल्याप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा

**| पनवेल | वार्ताहर |**

देशी दारूच्या दुकानात झालेल्या वादातून फिर्यादीसोबत हुज्जत घालून त्याला मारहाण केल्याप्रकरणी गोपाल बोहरे आणि प्रशिक साळवे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. रुपेश राजू वाघ हा कळंबोली येथे बसला होता. यावेळी प्रशिक साळवे आणि गोपाळ बोहरे यांनी येऊन देशी दारूच्या दुकानात झालेल्या वादातून त्याच्या सोबत हुज्जत घातली आणि त्याला मारहाण केली. आणि प्रशिक याने काचेच्या वस्तूने त्याला मारहाण केली.

## नेत्र तपासणी शिबिराला प्रतिसाद

### १०१ नागरिकांनी घेतला लाभ

**| रसायनी | प्रतिनिधी |**

समाजातील गरजू नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याच्या उद्देशाने चौक तुपगाव येथे एक हात मदतीचा सामाजिक संस्था, तुपगाव यांच्या पुढाकारातून मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.



या शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या शिबिरात तुपगाव व परिसरातील तब्बल १०१ नागरिकांनी मोफत नेत्र तपासणीचा लाभ घेतला. नागरिकांची नेत्र तपासणी करून त्यांना डोळ्यांच्या आरोग्याबाबत आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.समाजातील प्रत्येक घटकाच्या आरोग्याची आणि गरजांची जाणीव ठेवून गरजू नागरिकांना मदतीचा हात देण्याचे कार्य संस्थेच्या माध्यमातून सातत्याने सुरू आहे. आरोग्य, सेवा आणि सामाजिक बांधिलकी या त्रिसूत्रीच्या माध्यमातून भविष्यातही विविध सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रम राबविण्याचा संकल्प संस्थेने व्यक्त केला.

## खारेपाटातील पाणीप्रश्न कायमचा दुर्लक्षित

**| खरोशी | प्रतिनिधी |**

पाणी हा जगण्याचा मूलभूत अधिकार आहे. मात्र खारेपाटातील नागरिकांना आजही या मूलभूत प्रश्नासाठी संघर्ष करावा लागत असेल, तर ही परिस्थिती केवळ प्रशासनाची नव्हे, तर लोकप्रतिनिधींच्या भूमिकेचीही गांभीर्याने चिकित्सा करण्याची वेळ आहे अशी खंतही खारेपाट विकास संकल्प संघटनेचे सचिव सी. आर. म्हात्रे यांनी व्यक्त केली.

खारेपाटातील अनेक गावांना नियमित आणि पुरेसे पाणी मिळत नाही. कधी आठवड्यातून एकदा पाणी, कधी पाइपलाईनमध्ये बिघाड, तर कधी पाणीपुरवठ्याच्या नियोजनाचा अभाव या सगळ्याचा परिणाम थेट सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे. महिलांना पाण्यासाठी धावपळ करावी लागते, शेतकऱ्यांना शेतीच्या पाण्याची चिंता सतावते आणि नागरिकांच्या मनात एकच प्रश्न निर्माण होतो हा पाणीप्रश्न कायमचा सुटणार तरी कधी? का आयुष्यभर अशीच परिस्थिती असेल यावर विचार करण्याची वेळ आली आहे.

खारेपाटाच्या विकासासाठी निधी, योजना आणि आश्वासने यांची कमतरता नसल्याचे वेळोवेळी सांगितले जाते. मग प्रत्यक्षात पाण्यासाठी नागरिकांची अशी अवस्था का? योजना कागदावर आहेत की त्या प्रत्यक्ष जमिनीवर उतरल्या आहेत, याचा जाब घेणे आवश्यक आहे.

या प्रश्नात सर्वांत महत्त्वाची भूमिका असते ती लोकप्रतिनिधींची. जनतेने निवडून दिल्यानंतर केवळ उद्घाटने, सत्कार आणि राजकीय कार्यक्रमांपुरते लोकप्रतिनिधित्व मर्यादित राहू नये, अशी नाराजी व्यक्त करत ज्या भागातील नागरिक वर्षानुवर्षे पाण्यासाठी त्रस्त आहेत, त्यांच्या प्रश्नासाठी प्रशासनाच्या दारात ठामपणे उभे राहणे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे.

खारेपाटातील नागरिकांनी आंदोलने केली, निवेदने दिली, अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. पाणीप्रश्नावर तात्पुरती मलमपट्टी नको. पाइपलाईन दुरुस्त करणे, एखाद्या दिवशी टँकर पाठवणे किंवा काही दिवस पाणीपुरवठा सुरळीत करणे हा कायमस्वरूपी उपाय नाही. जनतेला आता आश्वासन नको आहे. नळाला नियमित पाणी हवे आहे आणि हा प्रश्न आजच सोडवण्याची गरज आहे. असे आवाहन खारेपाट विकास संकल्प संघटना सचिव सी. आर. म्हात्रे यांनी केले आहे.

## दोन मोबाईलची चोरी

**| पनवेल | वार्ताहर |**

गणेश मंडळात झोपलेले असताना दोघांकडील दोन मोबाईलची चोरी केल्याप्रकरणी अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. महेश कामठे आणि रमेश पोखरकर हे कामोठे येथे गणेश मंडळात झोपी गेले. यावेळी झोपताना उशी जवळ त्यांनी मोबाईल ठेवले होते. अज्ञात इसमाने सोसायटीच्या गेटमधून प्रवेश करून ८० हजार रुपये किमतीच्या दोन मोबाईलची चोरी केली.

### मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर अर्माडा नादुरुस्त | अवघ्या काही तासांत दुरुस्ती करून पुण्याकडे रवाना

## खोपोलीत जाग्या झाल्या दिघे साहेबांच्या आठवणी!

**| खोपोली | प्रतिनिधी |**

मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर पुण्याच्या दिशेने धावणारे एक अर्माडा वाहन १९ सप्टेंबर रोजी अचानक बंद पडले. सुरुवातीला ही नेहमीची वाहन बिघाडाची घटना वाटली; मात्र, हे वाहन स्व. धर्मवीर आनंद दिघे साहेबांनी आयुष्याच्या अखेरपर्यंत वापरलेले असल्याचे समोर आल्यानंतर या घटनेला भावनिक संदर्भ प्राप्त झाला. वाहन बंद पडले होते; पण दिघे साहेबांच्या आठवणींचा प्रवास थांबू नये, यासाठी खोपोलीत तातडीने दुरुस्तीची धावपळ सुरू झाली.



सुमारे दोन दशकांनंतर विशेष निमित्ताने हे वाहन ठाण्याबाहेर पुण्याकडे निघाले होते. पुण्यातील काही मानाच्या गणेश मंडळांनी दर्शनासाठी हे वाहन मागवले होते. त्यामुळे वाहन कोणत्याही परिस्थितीत पुण्यापर्यंत पोहोचविणे आवश्यक होते. एक्स्प्रेसवेवरील सुमारे २९ किलोमीटर अंतरावर वाहन ओव्हरहिट होऊन बंद पडले. डेल्टा फोर्सचे कर्मचारी दत्ता शेलार यांनी याची माहिती हेल्प फाऊंडेशनचे गुरुनाथ साठेलकर यांना दिली. त्यानंतर खोपोलीत वाहनाची दुरुस्ती करण्यासाठी तातडीने हालचाली सुरू झाल्या.

गुरुनाथ साठेलकर यांनी याबाबत माहिती दिल्यानंतर शिळफाटा येथे वाहनाची दुरुस्ती करून देण्याची जबाबदारी स्वीकारण्यात आली. त्यासाठी फारूक मचकुरे आणि उच्चप्पा शेठ वरचाली यांच्याशी संपर्क साधून दुरुस्तीची व्यवस्था करण्यात आली.

फारूक मचकुरे, इम्तियाज, फय्याज आणि उच्चप्पा शेठ यांच्या पथकाने वाहन दुरुस्तीची जबाबदारी स्वीकारली. टोइंग व्हॅनच्या मदतीने बिघाड झालेल्या ठिकाणाहून वाहन खोपोलीकडे आणण्यात आले. डेल्टा फोर्सच्या वाहनाने त्याला पायलटिंग केले. शिळफाटा, रायगड बाजार, स्व. इंदिरा गांधी चौक मार्गे अर्माडा खोपोलीत दाखल झाले. वाहन येण्यापूर्वीच दुरुस्ती पथक आवश्यक साधनसामग्रीसह सज्ज होते.

गोपनीयतेत दुरुस्तीचे काम स्व. आनंद दिघे साहेबांच्या वापरातील वाहन असल्याने त्याचे दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी होण्याची शक्यता होती. त्यामुळे संपूर्ण दुरुस्ती प्रक्रियेदरम्यान कमालीची गोपनीयता राखण्यात आली. कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलीस निरीक्षक सचिन हिरे कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी उपस्थित होते. नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनीही घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

दरम्यान, ठाण्याहून वाहनासोबत आलेल्या स्व. आनंद दिघे साहेबांच्या नातेवाईक व अनुयायांची गैरसोय होऊ नये, याचीही काळजी घेण्यात आली. त्यांच्या बसण्याची, चहा-पाण्याची तसेच आवश्यक सोयींची व्यवस्था करण्यात आली.

## निवडक

### नेरळमधील नागरी समस्यांवर २८ सप्टेंबरपासून उपोषण

**नेरळ** : कर्जत तालुक्यातील सर्वात मोठ्या असलेल्या नेरळ ग्रामपंचायतीमध्ये नागरी प्रश्न गंभीर झाले आहेत. ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत ग्रामस्थांना बोलू दिले जात नाही आणि त्यामुळे स्थानिकांनी उपोषणाचा इशारा दिला आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते गोरख शेप हे २८ सप्टेंबर पासून उपोषणाला बसणार आहेत. दरम्यान नेरळ गावातील प्रश्नाबाबत होऊ घातलेल्या उपोषणाला मोठा पाठिंबा सर्व स्तरावरून मिळत आहे. नेरळ ग्रामपंचायत हद्दीमध्ये निर्माण झालेल्या प्रश्नावर आवाज उठवण्यासाठी नेरळ गावातील तरुणांनी उपोषणाचे हत्यार घेतले आहे.याबाबत माहिती देण्यासाठी माहिती अधिकार कार्यकर्ते गोरख शेप यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. त्यावेळी ज्येष्ठ कार्यकर्ते माधव गायकवाड, तेहसीन सहेद, विशाल साळुंखे, केतन पोतदार, प्रवीण देशमुख आदी उपस्थित होते. यावेळी २३ सप्टेंबर रोजी होणारे नियोजित उपोषण गणेशोत्सव असल्याने पुढे ढकलले आहे.येत्या २८ सप्टेंबर पासून नेरळ गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे हे उपोषण केले जाणार आहे. नेरळ गावातील समस्यांबद्दल माहिती देताना नेरळ गावात पाणी नाही आणि अनेक ठिकाणी गावात पाणी पोहचत नाही.दुसरीकडे नागरीकरण होत असल्याने नेरळ,कोल्हारे, ममदापूर या तीन ग्रामपंचायत यांची नगरपरिषद करण्यात यावी, अशी माहिती देण्यात आली तर नगरपरिषदेसाठी आंदोलन सुरूच राहणार असल्याची माहिती दिली.

### आधुनिकतेच्या रंगात बाप्पाचा सण

**कापोली** : बदलत्या काळासोबत माणसाची जीवनशैली बदलली आणि सण साजरे करण्याचे स्वरूपही बदलले आहे. या आधुनिक युगात केवळ सजावट किंवा तंत्रज्ञानाचा वापरच बदललेला नाही, तर गणेशोत्सवामागची तरुणाईची भावना, कौटुंबिक श्रद्धा आणि ग्रामीण भागातील अर्थकारणही मोठ्या प्रमाणावर बदलत असल्याचे एक नवे चित्र यंदा पाहायला मिळत आहे. परंपरा जपत नव्या पिढीने या उत्सवाला आधुनिकतेची जोड दिली असली, तरी बाप्पावरील अथांग श्रद्धा आजही तशीच टिकून आहे. गणेशोत्सवाचे ग्रामीण भागातील जनजीवनावर आणि अर्थकारणावर किती मोठे नियंत्रण आहे, याचे उत्तम उदाहरण म्हणजे कामगार आणि ठेकेदारांची श्रद्धा. अनंत चतुर्दशीचे गणपती बाप्पा विसर्जन झाल्याशिवाय ग्रामीण भागातील कामगार आणि ठेकेदार नवीन किंवा जुन्या कोणत्याही कामाला सुरुवात करत नाहीत. बाप्पा घरात असेपर्यंत पूर्ण लक्ष आजच्या डिजिटल युगात सणाचा उत्साह साजरा करण्याची पद्धतही डिजिटल झाली आहे. बाप्पाच्या समोर बसून पारंपरिक भजने किंवा आरत्या म्हणण्यापेक्षा, तरुणाई रिल्स बनवणे, स्टेटस ठेवणे आणि फोटो शेअर करणे यात जास्त व्यग्र दिसते. नवी पिढी बाप्पाच्या आगमनाचा आणि विसर्जनाचा उत्साह मोबाईलच्या कॅमेऱ्यात कैद करून सोशल मीडियावर व्यक्त करण्यात अधिक धन्यता मानत आहे. मोबाईलचा वाढता वापर हा नव्या पिढीच्या उत्साहाचा एक मुख्य भाग बनला आहे.

### ऑनलाईन प्रवेश घेण्यासाठी मुदतवाढ

**रायगड** : शासकीय वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेंतर्गत ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळेस येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमातील नवीन विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज सादर करण्याकरिता वेळापत्रकात ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती सहाय्यक संचालक, सुनिल जाधव यांनी दिली आहे. इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेंतर्गत १२ वी नंतर व्यावसायिक व अव्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येतात. या योजनेची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन राबविण्यासाठी वसतिगृह प्रवेश प्रणाली कार्यन्वित करण्यात आली आहे. इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेंतर्गत व्यावसायिक व अव्यवसायिक विद्यार्थ्यांचे प्रवेश सुरु करण्यात आले आहेत.



### पावसाच्या सरींमुळे शेतकरी चिंताग्रस्त

**पाताळगंगा** : परतीच्या पावसाच्या दहशतीमुळे शेतकऱ्यांच्या मनामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सकाळपासून रणरणत्या उन्हाचा सामना करावा लागत असून तीन वाजण्याच्या सुमारास विजेच्या गडगडाटासह पावसाच्या जोरदार सरी येत असल्यामुळे शेतकरी अडचणी सापडला आहे. भातामध्ये दाणा तयार होण्याच्या मार्गावर असताना परतीचा पाऊस शेतकऱ्यांच्या मुळावर पडत आहे. त्याचबरोबर सध्या गणपती उत्सव सुरु असताना पावसाचे आगमन होत असल्यामुळे तरुणवर्गाचा हिरमोड होत आहे. सायंकाळ होताच परतीचा पाऊस सोसाट्याच्या वाऱ्यासह पडत असल्यामुळे, शेतकरी व कामगार वर्ग यांची मोठी तारांबळ उडत आहे. दिवसभर कडक उन्हामुळे प्रत्येक जण हैराण होत असून सायंकाळच्या गारव्यामुळे शेतकरी वर्गाची झोप उडाली आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy in furniture factory as a office boy/girl. Education- Graduation. Experience-3-4 years. Salary- 20,000 per month. Location- Bamansure, chondhi. Contact- 9823585321.
- Vacancy for store Manager in furniture store. Experience in sale- 5+years. Salary- 40,000 per month. Location-Zirad. Contact- 9823585321

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

**-: रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अलिबाग :-**

**-: निविदा सूचना :-**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, तर्फे दिपावली सणानिमित्त दिपावली शुभेच्छा ग्रिटींग व बॅनर्स छपाई करणेची आहेत.

वर नमुद केल्याप्रमाणे दिपावली शुभेच्छा ग्रिटींग व बॅनर्स खरेदी/छपाई करणेकरीता सप्लायर्स/विक्रेते यांचेकडून निविदा मागविण्यांत येत आहेत.

तरी ज्या निविदाधारकांना आपल्या निविदा सादर करावयाच्या आहेत त्यांनी आपल्या निविदा दिनांक २८.०९.२०२६ पर्यंत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचेकडे सादर कराव्यांत. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेंत येईल.

कोणतेही कारण न देता कोणतीही अगर सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार संचालक मंडळास राहील.

याबाबतची अधिक माहिती केंद्र कार्यालय अलिबाग येथे मिळेल.

**मुख्य व्यवस्थापक**
**प्रशासन व अस्थापन**

केंद्र कार्यालय अलिबाग.
दिनांक : २२.०९.२०२६

## जाहीर नोटीस

दिनांक : २२ सप्टेंबर २०२६

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०३ (तीन) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे हेदवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|
| | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| २६ | ५ | ०-०९-०० | ० | ०६ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
सही / -
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-२२/०९/२०२६
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड**

**फॉर्म झेड**

**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**

**स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा खोपोली चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजेच कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २६.१२.२०२५ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १७.०८.२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. सादिक बदरुद्दीन कराचीवाला यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक ३१.०७.२०२६ पर्यंतची रक्कम रूपये २२,२६,४३०/- व दिनांक ०१.०८.२०२६ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यंत त्यावरील १०.९५ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून गाव खोपोली, नगरपरिषद खोपोली हद्दीतील स.न.२३/१ अ सि.स.न ३०२१, ३०२२, ३०२३ खालापुर, तालुका खालापुर येथील खालील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणत्याही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा खोपोली च्या दिनांक ३१.०७.२०२६ रोजी येणे रक्कम रूपये २२,२६,४३०/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

**कर्जदार :- श्री. सादिक बदरुद्दीन कराचीवाला**

मौजे खोपोली, येथील श्री. सादिक बदरुद्दीन कराचीवाला यांचे नावे असलेले नगरपरिषद खोपोली हद्दीतील स.न. २३/१ असि.स.न ३०२१, ३०२२, ३०२३, सदनिका क्रमांक बी २०१, २ रा मजला, बी विंग, साबळे साई सिद्धी इमारत, क्षेत्रफळ ६७७ चौ.फुट

स्थळ : खालापूर
दिनांक : १८.०९.२०२६
सही/-
**श्री.आर.जी.पालकर**
**वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग**

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड**

**फॉर्म झेड**

**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११))**

**स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा खोपोली चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजेच कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २६.१२.२०२५ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १७.०८.२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार सौ. सुनिता राघव पिंगळे यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक ३१.०७.२०२६ पर्यंतची रक्कम रूपये १६,७६,१३९/- व दिनांक ०१.०८.२०२६ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यंत त्यावरील ११.५० टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून गाव शीळ, खोपोली नगरपरिषद हद्दीतील सर्वे क्र.२३/२ सिटी सर्व्हे २१९६ व सर्वे क्र. २३/२ सिटी सर्व्हे २१४४ खालापुर, तालुका खालापुर येथील खालील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणत्याही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा खोपोली च्या दिनांक ३१.०७.२०२६ रोजी येणे रक्कम रूपये १६,७६,१३९/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

**कर्जदार :- सौ. सुनिता राघव पिंगळे**

मौजे शीळ, येथील सौ. सुनिता राघव पिंगळे यांचे नावे असलेले नगरपरिषद हद्दीतील सर्वे क्र. २३/१ सिटी सर्व्हे २१९६ व सर्वे क्र.२३/२ सिटी सर्व्हे २१४४, डेक्कन रेसिडेन्सी, ७ मजला, ऐ विंग, सदनिका क्र. ७०१, क्षेत्रफळ ६५२ चौ. फुट

स्थळ : खालापूर
दिनांक : १८.०९.२०२६
सही/-
**श्री. आर.जी.पालकर**
**वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग**

## मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि.रायगड

**ई निविदा सुचना सन २०२६-२७**

**म्यु. जा. क्र. ५९३/ई - निविदा/मु.न.प. २०२६-२०२७**

मा. प्रशासक तथा मुख्याधिकारी, मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड यांचेकडून १. मुरुड जंजिरा नगरपरिषदेच्या विविध शाळांची देखभाल दुरुस्तीची कामे. या कामांची ई निविदा मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशिल व अटी शर्ती http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक २२/०९/२०२६ पासून उपलब्ध असून निविदा भरण्याचा अंतिम दिनांक २९/०९/२०२६ आहे.

दिनांक : २१/९/२०२६
सही/-
**मुख्याधिकारी**
**मुरुड जंजिरा नगरपरिषद**

## जाहीर नोटीस

दिनांक २१/०९/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचित करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे कडाव, ता.कर्जत, जि.रायगड येथील,

| सर्व्हे/हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|
| २२/४ | ०-७३-७० | २-६९ |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक श्री.कमळाकर मारूती गायकवाड यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे. तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणतही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ३ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तीचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशीर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमिन मिळकत संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा.मातोश्री निवास आवळस, ता.कर्जत, जि.रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे - सहाण, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनाची बिनशेती जमीन मिळकत श्रुती मनियन, क्षेत्र ०-४६-५० आर चौ.मी., शशांक मनियन, क्षेत्र ०-४६-५० आर चौ.मी. व के.व्हीएस मनिअम, क्षेत्र १-८६-०० आर चौ.मी., यांच्या मालकीची असून, सदर जमिन मिळकत माझे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असून, तशा आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलां दरम्यान झालेली आहे.

**बिनशेत जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| सहाण, ता. अलिबाग जि. रायगड | ३०४/५ | एकूण क्षेत्र २-७९-०० | २७.९० |

सदर बिनशेत जमीन मिळकत पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध व अन्य कोणताही बोजा, साठेकरार, ताबा, कब्जा, कुळव्यवहार, चार्ज, पोटगी हक्क, बक्षिस भाडेपट्टा, फरोक्तखत, जाण्या-येण्याचे मार्ग लिज,दावा वगैरे अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ चौदा दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २१/०९/२०२६
सही/-
**(ॲड. वैभव वसंत पाटील)**
रा. नवेदर बेली, ता. अलिबाग
जि. रायगड, मो ९८५०२६१००८
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे मुगपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतींचे मालक/भोगवटादार-मेलडी मेकर रिसॉटर्स प्रायव्हेट लिमिटेड यांचेकडुन खरेदी घेण्याबाबत आमच्या अशिलांच्या व्यवहाराच्या वाटाघाटी सुरु आहेत.

**जमिन मिळकतींचे वर्णन**

**मौजे मुगपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील**

| भुमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १ | १ | ०-४३.०० | ५.०७ |
| १ | २ | १-६०.६० | १७.८२ |
| २ | १ | ०-८६.९० | ३.०० |
| २ | ३ | ०-२२.०० | १.५६ |
| २ | ४ | ०-४०.०० | ०.३४ |
| ४ | १/ब | ०-१६.७० | ०.४८ |
| ९ | १ | ०-१८.५० | ०.९७ |
| ९ | २ | ०-०३.०० | ०.११ |
| ४७ | ८ | ०-२७.९० | ०.३१ |
| ४७ | १० | ०-३२.५० | ०.८३ |

त्याअर्थी सदर संबंधित व्यक्तींव्यतिरीक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु. हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१(एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील मेलडी मेकर रिसॉटस् प्रायव्हेट लिमिटेड यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि : २२/०९/२०२६
**श्री.तुषार द.देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता:फ्लॅट नं. ए-२, जय नगर को.ऑप हौ सोसा.लि. कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६, जि.रायगड. मोबाईल नं.९३२५००४००८

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे कोपर, ता. अलिबाग येथील खालील मालक श्री लालचंद गंगाधर पाटील रा. चरी, ता. अलिबाग यांचेकडून खरेदी करणेचे ठरविले आहे.

संदर्भित मिळकत निर्वेध व बिनजोखमी असल्याचे मिळकतीचे मालकांनी माझे अशिलास सांगितले आहे. परंतू याउपरही सदर मिळकतीवर अन्य त्रयस्त इसमाचे कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत माझेकडे लेखी पुराव्यासहित हरकत घेणे व माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा ठरलेला व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही व ते माझे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे कोपर, भूमापन क्र.३९/१ एकूण क्षेत्र २-०७-२० हे- आर, आकार, ७-३७ या मिळकतीपैकी श्री लालचंद गंगाधर पाटील यांचे मालकी हिस्स्यात असलेली ०-३७-० हे आर क्षेत्रापैकी ०-२१-० हे आर क्षेत्र ही मिळकत

ता. २१/९/२०२६
सही/-
**ॲड. प्रसाद वर्तक**
जिल्हा न्यायालय
अलिबाग- रायगड

## जाहीर नोटीस

दिनांक : २२/०९/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली विद्यमान मालक १) संजय आत्माराम पुरो, २) शुमदा राघोबा पावसकर, ३) सुचित्रा प्रकाश चमणकर यांच्या सामाईक मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील वहिवाटीची मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे अशिल यांच्याबरोबर चालु आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| सासवणे, ता.अलिबाग | २७० | ०-१७-५० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-१८-५० | ३.०५ |

**वर नमुद केलेल्या मिळकतीपैकी विद्यमान १) संजय आत्माराम पुरो, २) शुमदा राघोबा पावसकर, ३) सुचित्रा प्रकाश चमणकर मालक यांच्या सामाईक मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील वहिवाटीची बागायत मिळकत ०-०६-०० गुंठे या जाहिर नोटिसचा विषय आहे.**

**सदर मिळकतीस चतुसिमा खालीलप्रमाणे,**
पुर्वेस गट नं. २५५, २५६
पश्चिमेस गट नं. २७०, २७१ दक्षिणेस गट नं. २५९
उत्तरेस गट नं. २७२

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड.अमर अशोक घरत,**
मोबा.नं.७७९८९३०७०८

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे वावे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक माधवी काशिनाथ कुंडल रा. बी/१२, पारसमणी अपार्टमेंट, मिरची गल्ली, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड असलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| वावे, ता. अलिबाग | १२/१/१ | ०-९७-९० पो.ख. ०-०४-३० एकूण १-०२-२० | १६.५९ |

वर नमुद मिळकतीपैकी क्षेत्र ०-३१-९० हे. आर., आकार रु. ५.४१ पैसे ही भातशेती मिळकत व या मिळकतीमधील ग्रुप ग्रामपंचायत बेलोशी घर क्र. ११८८, क्षेत्र ११२५ चौ. फूट (१०४.५५ चौ.मी.) हि घर मिळकत.

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : /०९/२०२६
सही/-
**श्री.शेखर विष्णू मगर**
पत्ता : दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद सदनिका, सदनिकेचे विद्यमान मालक सौ. संयोगीता हर्षल पाटील मु. फ्लॅट नं. ७, श्रीधर २० हनुमान रोड, गजाली हॉटेल समोर, मुंबई ४०० ०५७, यांच्याकडुन खरेदी घेण्याबाबत व्यवहार करण्याचे ठरविलेले आहे.

**सदनिकेचे वर्णन**

मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील सिटी सर्व्हे नं.१, हिस्सा नं.१, बिनशेती प्लॉट नं. १ या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या ''आत्माराम नगर सहकारी गृह निर्माण संस्था मर्यादीत'' बिल्डींग नं.१ या इमारतीमधील तळ मजल्यावरील निवासी सदनिका नं.१, क्षेत्र ५२७ चौ.फूट बिल्टअप ज्याचा चेंढरे ग्रामपंचायतीमधील अनु.क्र.५०७, मालमत्ता क्र. १५९/१ ही निवासी सदनिका या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क (जाण्या येण्याचा मार्ग) या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत सादर करावी.

उक्त मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे, असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांना कळावे.

अलिबाग
दिनांक : २२/०९/२०२६
सही /-
**ॲड.अंकिता राहुल पाटील**
निर्मल सेल्स, नागडोंगरी,
ता.अलिबाग जि.रायगड
मोबा. ९९६७१२०११२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्या मिळकतीचे मालक १) श्री. मुहम्मद युसुफ उमर कपाडीया, २) सौ. फातीमा हाजी युसुफ कपाडीया, ३) श्री. हुजेफा युसुफ कपाडीया यांचेकडून विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन:**

**मौजे-साळोख तर्फे वरेडी, ता.कर्जत, जि.रायगड**

| सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|
| | | हे.आर.चौ.मी. | रूपये | पैसे |
| ७० | ३ | एकुण क्षेत्र ३-०५-०० | २ | ८५ |
| ७० | ४ | एकुण क्षेत्र ०-१५-०० | ० | १५ |
| ७१ | ० | एकुण क्षेत्र २-८३-३० | १४ | ४० |
| ७२ | १ | एकुण क्षेत्र ०-३८-४० | ४ | ०० |
| ७२ | ३/अ | एकुण क्षेत्र ०-१६-२० | १ | ०० |
| ७२ | ३/ब | एकुण क्षेत्र १-१०-०० | ५ | ४५ |
| ७२ | ४ | एकुण क्षेत्र ०-३३-१० | ० | ४० |
| ७३ | ३ | एकुण क्षेत्र ०-५४-०० | ० | ५५ |
| ७३ | ४ | एकुण क्षेत्र ०-९३-०० | ० | ७० |

सबब सदर बाबत कोणाचीही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहीवाट, बक्षीसपत्र लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक २२/०९/२०२६
पत्ता: १०१, १०२, १०३, बुरहान प्लाझा, दिलकप कॉलेज रोड, ममदापुर, पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड- ४१०१०१
मो. ९०११५५५८०१
सही /-
**ॲड.अल्ताफ लियाकत डोंगरे**
(वकिल उच्च न्यायालय)

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक मुमताज निसार अहमद मुल्ला, मनहर निसार मुल्ला व यासमिन जावेद दर्जी यांचेकडुन खरेदी घेण्याचा करार केला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे तळवली, ता. मुरूड, जि. रायगड येथील**

| गट क्रमांक | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|
| ७८/२ | ०२-००-०० | १.५० |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक २२/०९/२०२६
**ॲड. अक्षय सुधीर म्हात्रे**
''अन्नपूर्णा'', मु.पो.धोकवडे,
ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ११२/६ | एकूण क्षेत्र ०-४५-०० हे.आर | ०.२३ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही
दिनांक :-२२/०९/२०२६
**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ता:- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ, मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे दिघाटी, ता. पनवेल, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १५/१ | एकूण क्षेत्र ०-०७-१० हे.आर | १.१२ |
| ६१/१/अ | एकूण क्षेत्र ०-१४-४० हे.आर | ३.०० |
| ६३/३ | एकूण क्षेत्र ०-०६-०० हे.आर | ०.१६ |
| ६३/११ | एकूण क्षेत्र ०-१२-९० हे.आर | ०.२५ |
| ६४/१ | एकूण क्षेत्र ०-२०-०० हे.आर | ०.५३ |
| ६४/२ | एकूण क्षेत्र ०-१०-०० हे.आर | ०.२५ |
| ६४/७/१०/१ | एकूण क्षेत्र ०-०६-१० हे.आर | ०.२२ |
| ७६/५ | एकूण क्षेत्र ०-७५-०० हे.आर | २.९९ |
| ६६/३/१ | एकूण क्षेत्र ०-१६-४० हे.आर | ३.७८ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :-२२/०९/२०२६
**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ता:- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ, मु.पो.कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे [illegible]ने- तन्मणी, चींचपेटी, [illegible]गड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# गणेश दर्शन स्पर्धा २०२६



●सोनाली गौरव दांडेकर आरडीसीसी बँक कर्मचारी आणि गौरव बाळाराम दांडेकर उद्योजक (दांडेकर सर्व्हिस सेंटर,GRV साऊंड्स) पेझारी चेकपोस्ट



● वर्षा राजेंद्र काशिनाथ पाटील. मु. कावाडे, ता. अलिबाग



● मुरूड कोळीवाडा येथील संजय हरेश्वर चोगले यांच्या निवासस्थानी श्री गणेश मूर्ती. मूर्तीकार अच्युत चव्हाण (छायाचित्र : सौरभ नाझरे)



● थळ पालथी येथील वैभव सुरेश नाईक यांनी रायगडचे प्रवेशद्वार अशी नयनरम्य गणरायाची सजावट केली आहे. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● मु. मुनवली, ता. अलिबाग येथील घाडी बंधू यांच्या निवासस्थानी विराजमान गणपतीसमोर भजन करताना ग्रामस्थ मंडळ. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



●श्री. सुरज गजानन ठाकूर यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना. श्री. प्रतिक भालचंद्र खारकर (शेकाप पुरोगामी युवक संघटना सदस्य बामणगाव)



● दत्ता अवधूत एंटरटेनमेंटचे निर्माते कौस्तुभ छाया विलास भिडे यांच्या स्टुडिओमध्ये विराजमान झालेले बाप्पा. (छायाचित्र : मुस्कान खान)



●श्री विपीन पांडुरंग झुरे आणि परिवार मु. न्हावे-रोहा यांच्या निवासस्थानी विराजमान गणेशमूर्ती. (छायाचित्र- सत्यप्रसाद आडाव)



●श्री. नितीन खारकर यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना. श्री. प्रतिक भालचंद्र खारकर (शेकाप पुरोगामी युवक संघटना सदस्य बामणगाव)



● व्यावसायिक आर्टिस्ट तथा व्यंगचित्रकार योगेश निखारे यांच्याघरी विराजमान झालेले श्री गणराय (छायाचित्र : मुस्कान खान)



●श्री. पांडुरंग विष्णु घरत रा. लोणारे-घरत आळी, पो. थळ-अलिबाग चलचित्र देखावा : यंदा बाप्पाच्या संगतीत... रामायण अवतरलं ! एका बाजूला रावणाच्या कैदेत सीता माई, दुसऱ्या बाजूला सेतू बांधणारी वानरसेवा.

## स्मृतीचा क्रिकेटमध्ये मोठा विक्रम

**। नागोया (जपान) । वृत्तसंस्था ।**

स्मृती मानधनाने महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एक मोठा विक्रम रचला आहे. ४,७६५ धावांसह, मानधनाने न्यूझीलंडच्या सुझी बेट्सला मागे टाकत या फॉरमॅटमध्ये सर्वाधिक धावा करणारी क्रिकेटपटू बनण्याचा मान मिळवला आहे. सध्या सुरू असलेल्या आशियाई खेळ २०२६ मध्ये निशिनमध्ये बांगलादेशविरुद्धच्या उपांत्य फेरीच्या सामन्यादरम्यान मानधनाने ही कामगिरी केली. मानधना १९ चेंडूंमध्ये पाच चौकार आणि दोन षटकारांसह ३७ धावांवर बाद झाली. मानधनाच्या नावावर आता महिला टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ४,७८८ धावा आहेत, तर सुझी बेट्स ४,७५८ धावांसह दुसऱ्या स्थानावर आहे.



२०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत बांगलादेशविरुद्धच्या सामन्यादरम्यान मंधानाने ही कामगिरी केली. महिलांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्यांच्या यादीत भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरचाही समावेश आहे. ती ४,२८७ धावांसह तिसऱ्या स्थानावर आहे. श्रीलंकेची चमारी अटापट्टू ४,२८२ धावांसह चौथ्या, तर न्यूझीलंडची सोफी डिव्हाईन ३,८१७ धावांसह पाचव्या स्थानावर आहे. स्मृती मानधना आता महिलांच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये तिन्ही फॉरमॅटमध्ये सर्वाधिक धावा करणारी क्रिकेटपटू आहे. तिच्या नावावर एकूण १०,९८७ धावा आहेत. टी-२० क्रिकेटमध्ये स्मृती मंधानाने नाहिदाविरुद्ध ४० चेंडूंमध्ये ५३ धावा केल्या आहेत. मात्र, नाहिदाने तिला चार वेळा बाद केले आहे. या काळात मंधानाची सरासरी १३.२५ आणि स्ट्राइक रेट १३२.५ आहे.

## रुद्राक्ष,पार्थ,हिमांशूला एअर रायफलमध्ये 'रौप्यपदक'

**। नागोया । (जपान) । वृत्तसंस्था ।**

आयची-नागोया येथे सुरू असलेल्या आशियाई खेळ २०२६ मध्ये, पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल सांघिक प्रकारात रुद्राक्ष पाटील, पार्थ माने, हिमांशू ढिल्लन या त्रिकुटाने रौप्यपदक जिंकत भारताची नेमबाजीतील पदकांची घोडदौड कायम राखली. भारतीय संघाने १८९०.१ गुणांसह रौप्यपदक मिळवले. चीन ८९९.० गुण नोंदवत पहिल्या स्थानावर द. कोरिया १८४१.४ गुणांसह कांस्यपदक पटकावले. आशियाई खेळ २०२६ मधील हे त्यांचे तिसरे पदक ठरले असून, ही तिन्ही पदके नेमबाजीतील रौप्यपदके आहेत. या त्रिकुटाने एकत्रितपणे १८९०.१ गुणांची कामगिरी करत सांघिक रौप्यपदक जिंकले.

## भारताची इंडोनेशियावर १३-१ ने मात

**। नागोया (जपान) । वृत्तसंस्था ।**



भारतीय पुरुष हॉकी संघाने २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील आपल्या मोहिमेची सुरुवात विजयाने केली. भारतीय संघाने पूल 'ए' च्या सामन्यात इंडोनेशियाला १३-१ ने पराभूत केले. गिफू प्रीफेक्चरल ग्रीन स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात भारताने सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवले.

भारतासाठी आठ वेगवेगळ्या खेळाडूंनी गोल केले. एकट्या दिलप्रीत सिंगने चार गोल करून उत्कृष्ट कामगिरी केली. सहाव्या मिनिटाला शिलानंद लाक्राने भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर १२ व्या मिनिटाला अभिषेकने भारताची आघाडी दुप्पट केली.

■ **पूल 'ए' मध्ये मोहिमेची दमदार सुरुवात**

■ **पुढील सामना श्रीलंकेबरोबर**

इंडोनेशियाच्या गोलरक्षकाने सुरुवातीचे काही प्रयत्न वाचवले, पण भारताने आपला दबाव कायम ठेवला. पहिल्या क्वार्टरच्या अखेरीस भारताने २-० अशी आघाडी घेतली होती. दुसऱ्या क्वार्टरमध्ये, दिलप्रीत सिंगने दोन मिनिटांत (१८ व्या आणि १९ व्या मिनिटाला) दोन गोल करून आघाडी ४-० पर्यंत वाढवली. भारताने शेवटच्या क्वार्टरमध्येही आपला आक्रमक खेळ सुरू ठेवला.

जुगराज सिंगचा पहिला प्रयत्न एका बचावपटूने रोखल्यानंतर, ४७ व्या मिनिटाला त्याने आपल्या दुसऱ्या पेनल्टी कॉर्नरवर गोल केला. ४८ व्या मिनिटाला सुखजीत सिंगने आपला दुसरा गोल केला. त्यानंतर ४९ व्या मिनिटाला दिलप्रीत सिंगने सामन्यातील आपला चौथा गोल करून भारताला १३-१ अशी आघाडी मिळवून दिली.

शेवटच्या मिनिटांमध्ये इंडोनेशियाने सर्कलमध्ये चेंडूचा ताबा ठेवण्याचा प्रयत्न केला, परंतु भारतीय बचावफळीने त्यांना फारशा संधी दिल्या नाहीत. इंडोनेशियाविरुद्ध दणदणीत विजय मिळवून भारताने पूल 'ए' मधील आपल्या मोहिमेची दमदार सुरुवात केली आहे. भारतीय संघ पुढील सामना श्रीलंके बरोबर होणार आहे.

## भारतीय महिला संघाचा अंतिम फेरीत प्रवेश

**। नागोया (जपान) । वृत्तसंस्था ।**



**शफाली वर्माची शतकी खेळी**

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने बांगलादेशवर मात करत आशियाई खेळांमधील महिला क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. गतविजेता भारत आता आपले विजेतेपद टिकवण्यासाठी अंतिम सामन्यात श्रीलंकेचा सामना करेल. नऊ दिवसांत विजेतेपदाच्या लढतीत हे दोन्ही संघ दुसऱ्यांदा एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. यापूर्वी, १३ सप्टेंबर रोजी त्यांच्यात आशिया कपचा अंतिम सामना झाला होता, ज्यात भारताने ७२ धावांनी विजय मिळवला होता. उपांत्य सामन्यात भारताने बांगलादेशला ११४ धावांनी पराभूत केले. शफाली वर्मा भारताच्या या विजयाची शिल्पकार ठरली. तिने ४९ चेंडूंमध्ये नाबाद १०० धावा करून आपल्या व्हाईट-बॉल कारकिर्दीतील पहिले शतक झळकावले. प्रथम फलंदाजी करताना भारताने चार गडी गमावून १९५ धावा केल्या. शफालीने ४९ चेंडूंमध्ये नाबाद १०० धावा केल्या, तर सलामीवीर स्मृती मंधानाने १९ चेंडूंमध्ये ३७ धावा केल्या. यासह, मंधाना महिला टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वाधिक धावा करणारी खेळाडू ठरली. प्रत्युत्तरात, बांगलादेशचा संघ आपली पूर्ण २० षटके खेळू शकला नाही आणि १५.४ षटकांत ८१ धावांवर सर्वबाद झाला. दीप्ती शर्माने २.४ षटकांत सात धावा देऊन तीन बळी घेतले आणि नंदिनी शर्माने चार षटकांत २५ धावा देऊन तीन बळी घेतले. तिच्या व्यतिरिक्त, श्री चरणीने सात धावांत दोन बळी घेतले.

## राकेश कुमारवर आजीवन बंदी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

नॅशनल अँटी-डोपिंग एजन्सीने जाहीर केलेल्या कारवाईच्या ताज्या यादीनुसार, प्रतिबंधित पदार्थ दिल्याबद्दल थलेटिक्स प्रशिक्षक राकेश कुमारवर आजीवन बंदी घालण्यात आली आहे; तर प्रतिबंधित औषधे बाळगल्याप्रकरणी आणि त्यांची तस्करी केल्याप्रकरणी पॉवरलिफ्टर गौरव वत्स याला तात्पुरते निलंबित करण्यात आले आहे. राकेश यांना गेल्या वर्षी मार्चमध्ये निलंबित करण्यात आले होते आणि त्यांची ही बंदी त्याच कालावधीपासून लागू मानली जाईल. राष्ट्रीय आंतरराज्यीय चॅम्पियनशिप कांस्यपदक विजेती धावपटू प्रकृती रूपा राव हिला प्रतिबंधित स्टिरॉइड्स स्टॅनोजोलॉल आणि ड्रोस्टानोलोनसाठी पॉझिटिव्ह चाचणी आल्यानंतर तात्पुरते निलंबित करण्यात आले आहे. इतर प्रमुख नावांमध्ये खेलो इंडिया गेम्स सुवर्णपदक विजेती वेटलिफ्टर चेल्सी हिचा समावेश आहे, जिच्यावर डोप चाचणीत अयशस्वी ठरल्याबद्दल पाच वर्षांची बंदी घालण्यात आली आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)